


# गांवरान कथा

## विनोदी कथा

ANAND JADHAV

# डाक्टर डाक्टर (नगरी) (मराठी भाषा दिन २०१६)

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 21/02/2016 - 05:36

लै कै तरि करुन दाखायचय आपल्याला अन तेच्यामुळच, धाव्वीला पन्नास अन बारवीला बावन टक्के पडून बी, आपुण हेवच् फिल्ड निवडला.

आता दोनीक साल झालत गावात दावखाना टाकून. एखादा कटाळून गेला असता गोळया वाटून वाटून आणि इंजेक्शनं टोचुन टोचुन. पर आपलं तसं नाय. ते करत करत तेवढ़याच हुत्साहात अजुन आपले इतर बी परयोग चालुहेत. चलाख डोस्क अन खटपट्या सभाव अशल्यामुळं अपले परयोग लगीच जमुन येतात.
अता कालच्या बुधारचंच बघा ना; एक म्हतारा (मजी दिनु सुताराचा आजा) माह्याकडं (मजी दावखान्यात) आला हुता. त्यावक्ताला म्या आपल्या मोठ्या साहेबाचं रेडुवर चाललेलं "नया भारत, ईवा भारत, ईवा खुण,ईवा..ईवा.." ऐकत हुतो.

रेडु चालूच हुता, म्या फूडं गाळपटून बसलेल्या, खप्पड़ म्हताऱ्याला बघितलं अन माह्या डोसक्यात (वरून खाली आपटलेला शेप बघुन निवटनाच्या डोस्क्यात पडला तसाच) भापकिन पर्काश पलडा.

म्या लग्गीच् मारतीच्या पारावर पत्ते कुटत बसलेल्या दोन तीन दांडग्या पोराहिला बोलून घेतलं. त्याहिला पन्नास पन्नास च्या नोटा दिउन कप कप रघत काढून घितलं. अन ते ईवा पिढीचं, उसळतं रघत त्या जुन्या पिढीच्या म्हताऱ्याला लावलं. म्हातारं तासभरात एकदम त्याट होऊन घरला गेलं.

हेव परयोग भारतभर राबुन सगळंच रघत ईवा करायच्या इराद्यानं (म्या लिव्हायला चालु केल्याल्या परबंधात) म्या लीवुन ठिवला.

मंग दुसऱ्या दिशी, 'आपुन केल्याल्या परयोगाचा साऱ्या अंगानि इचार होयला पाइजी मनुण', म्या स्वताः म्हताऱ्याच्या घरला गेलु.

म्हातारा आत खाटावर पडलेला हुता. दिनु सुतारानं दारातचं मला आडीलं.

"म्हताऱ्याला हात लावायचा नाय" दिन्या एकदम रागात बोलला.

अता हे परयोग काय फुकटात करुन भागणार नव्हतं मनुन काल म्या आपलं पोराहिच्या रघताची शंभर, मह्या डोसक्यात आयड़या आली त्याचं पन्नास अन माह्या कारागिरीचं पन्नास असं समदं मिळून फकस्त दोनिकसं रुपय घेतलं त्याचा ह्या दिन्याच्या मनात राग. म्हणलं येउन्द्या अला त् अला. ह्या असल्या चिकट अन दळभद्रया लोकायमुळच् आपला देस मागं रायलाय. नै तर माहयासारख्या एखाद्या परयोगिक डाक्टरानं मेली माणसं जीत्ती करायचं अवषध खोजलं असतं.

दिन्याचा आपल्याला बी राग आला पर परयोगाचा साऱ्या बाजुनं इचार होयला पायजेल मनुण राग घटाघटा गिळत (मोठ्ठालि माणसं गिळतात तसं) म्या त्याला इच्चारलं;

"हात नए लावत बबा! पर पेशंटमंदी कई फरक पड़लाय का नई ते त् सांग?"

"पालड़ायना! फरक पलडाय! म्हतारा पैलं बसुन मुतायाचा आता तेट हुभा ठाकुन मुततो" अडमुठ दिन्या दाराला भायरून कड़ी घालत बोलला.

एका परयोगिक डाक्टरचा असा अपमान! पर म्या खचुन जाणारा नवतो!

माघारी येतांना तुका सरमाट्याची माय दारात खोकत बसल्याली दिसली. म्या तिच्याजवळ जाउन

"चल दावखान्यात तुला चुटकित बरा करतु" असं मनलं, त् ति ताटकन घरात निघुन गेली अन खिड़कीतून

"मटन शिजाय टाकलय! तेचा ठसका हुता!" मनाली.

तिला कैच झालेलं नवतं. ति ठनठनीत निघाली. मनलं जाउद्या, निघुद्या असल्या अडचणी येनारच.
तर काय सांगत हुतो की म्या हे फिल्ड निवलड़ं. खरं त् तवाच्याला आपल्यात एवढं डेरिंग नव्हतं पर बाप जाम डेरिंगबाज. शिवारात हे डाक्टरकीचं कॉलिज चालु झालं की त्यानं दोन एक्कर रान इकायला कालढं.
बोलला;

"हणम्या एक दोन लेकरं होउस्तर शिकला तरी जमन! पर तु डाक्टरच झाला पाहिजीस!"

बाप, डायरेक्ट डायरेक्टरला (मजी आमचे आमदार साहेबला) जाउन भेटला अन तासाभरात महं त्या कॉलेजात नाव घातलं.

मंग आता घरातुनच एवढं घासलेट रिचल्या गेल्यावर माह्या डोसक्यातला ग्यानाचा दिवा कामुन ढसा ढसा पेटनार नाय.
म्या खच्चुन अभ्यास केला पर दरवर्षाला कै तरी बिनसायचं. तरी बी म्या एक एक इषय निवडून काढत पैली 'पोरगी' (मजी माही लेक) अन 'डिग्री' सोबतच मिळील्या.

गावात नवा नवा दावखना टाकला तव्हां गड़बड़ होयची. मंजी, गोळयायाची नावं माह्या धेनात रायची नै अन मंग पडसं असलेल्या पेशंटाला जुलाबाच्या गोळया जायच्या. मंग हळु हळु पेशंट हुशार झाले, पडसं वाले पेशंट मनायाचे;

"सायेब, मांगच्या बारचीना जुलाबाला तुमी डिक्टिव ह्याच गोळया दिलत्या"

मंग मी तेला दुसऱ्या गोळया द्यायचो.

असं बार बार होया लागलं तवा माह्या चलाख डोसक्यात आयड्या शिरली. म्या बजारातून डजनभर पिलास्टिकच्या रिकाम्या बाटल्या आणल्या तेच्यावर 'तापिच्या गोळया', 'खोकल्याच्या गोळया', असल्या चिठ्या लावल्या अन मंग त्या बाटल्यात गोळया

भरल्या.

पेशंट मनला डोस्क दुखतय की लगेच, 'डोक्याच्या गोळया' ची बाटली काढायाची अन हाताला येत्याल तश्या चार दोन गोळया द्यायाच्या.

पेशंटचं पोट दुखत असन त् 'पोटाच्या गोळया'ची बाटली काढ़ायची.

मंग सगळं निवांत सुरु झालं.

पर 'यशाच्या शिकरावर लोळनाऱ्या माणसा मव्हरंबी अडचणी हुभा ठाकतात' ह्या सुविचारात सांगितल्यावनि एकबारचीना कुणतरी गावात बातमी सोलडी की, 'आयुरयेदावाल्या डाक्टराला इंजेक्शन देयाची परमिशन नाय.' तवा चार दोन हप्ते इंजेक्शन बंद ठोवा लागलं. पर पुनः चालु केलं.

एवढं समदं करत करत म्या पेशंट लोकायच्या मानसिकशास्त्राचा बी अभ्यास करुन नोंदुन ठिवलाय. माह्या नोंदिवरून म्या असं म्हणतो की खेड्यातली अन शेहरातली अशी दोन परकारचि पेशंट असत्यात. खेड्यातलि बिचारी गरीब असत्यात, दिली ती अवषधं गुपचिप खात्यात. अन त्याच्या उलटी शेहरातलि, निस्ती इचारित राहत्यात. ह्या गोळीचं नाव काय? त्या गोळीचं नाव काय? ह्या गोळीची एक्सपारि डेट काय? त्या गोळीचं कव्हर फाटलेलं कमुन?

एकदा एक पेशंट त् "ह्या गोळीत काय काय कन्टेन्ट हाई सांगा" म्हणू लागला. रागं रागं म्या त्याच्या हातातुन गोळयाचं पाकिट घितलं अन त्याला वरल्या आळीच्या डाक्टर कडं धाडलं.

तर म्या मनतु डाक्टर टिकून ठोयचा आसन त् जगातल्या सगळया डाक्टरायणी फकस्त खेड्यातल्याच् पेशंटांचा इलाज करायला पायजेन. म्या तर तेच ठरिलय. फकस्त तेवढ़चं नाय तर म्या हाक मारताना खेड्यातल्या पेशंट ला 'ये पेशंट' मनतो अन शेहरातल्यालांना 'ये रोगी' अशी हाक मारतु. आपुआप पळून जात्यात.

म्या पैल्या पसुन लय खस्ता खाल्ल्या. दुनिया, म्या डाक्टर झाल्यापसुन बराबर साथ देत नव्हती पर बापानी, अन पाठुपाठ म्या, उलशिक बी कच खाल्ली नाय.

तवा अता आपलं हेच सांगणं की डाक्टरला गोळयाची नावं पाठ हैत की नै ते बघू नका, डाक्टरची डिग्री कुणती ते बघू नका, तेव दिईन ती गोळी गपगुमान पाण्याबर खा.

अता हेच बघाना धाव्वीला म्हराठीत पस्तीसच मार्क पलड़े तरी बी तासभरात पेशंट ची वाट बघत बघत म्या कशी चार पाच पानं लिवुन कालढी.

# डाक्टर डाक्टर-2

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 06/03/2016 - 02:44

आपला भारत देस लैच झक्कास. इथलचि लोकं (मजी मह्या गावातलीच) सगळयात भारी. त्याहीचे इच्चार, वागणूक- बिगनुक, कामं-धंदे एकदम जबरदस्त. अपुन त्याहीचे एक नंबर फॅन.
बिचारी दावखान्या मोहरुण जाताना आदबीनि वाकुन 'राम-राम' घालत्यात. वाटात कुढं भेटली की लग्गीच् "काय डाक्टर साहेब? बरं हाय ना?" असं इच्चारतात. आपल्याला त् भौ त्यहिच्या कडून तपासायची फि घ्यायची बी इच्छा हूत नै. पर मनलं आपल्याला बी पोट हाय, मनुन आलं पेशंट की आपुण तेला पैलं सलायण लावतु अन सलायणचं अन त्यात सोलड्याल्या इंजकशनाचं तेवढं दोन अडीचसं रुपय घेतु बाकी भायेरच्या डाक्टरवानी तपासा बिपासाचा एक रूपा लावत नै. अन ती बिचारी देतात बी.
खरच भारत लै मस्त देस हाय! एकदम प्रेमळ!
आपुण त् भौ इथं एकदम सूट झालोत. मोठ्या लोकांत उठबस असल्यामुळं गावांत आपल्याला मानमरताब बी हाय अन कुणी आपल्या आड्यात बी जात नाय.
वरून आपला धंदा बी जोरात चालतु. तेवढं सुगीच्या दिसात थोड़ा डिम असतुया पर पाउसकळयात सगळं भरून निघतं. अन त्यातली त्यात आंब्यानी साथ दिली त् पाउसकळयाच्या तोंडालाच, ढाळ-उलट्यात्, वरीसभराचा धंदा होऊन जातुया.
पैलं, साळंत असताना, कुणी आवडता ऋतू इच्चारला की आपुण उन्हाळा सांगायचो. उन्हाळयाच्या सुट्ट्या मुळं. पर आता आपला सगळयात आवडता 'पाउसकळा' हाय. लय चानस मिळतो, पेशंट लोकायची शेवा करायचा. त्याचं होतं काय की पाउसकळयात उलशिक का होईना पर पाऊस पडतुच. मंग सगळीकडं चिकचिक होऊन जाते. सगळीकडं गवत उगतं. अन मंग, संडास बाथरूम बांधायला सरकारनी दिलेलं पैसं लगीनसराईत उडाल्यामुळं अख्ख्या गावातल्या बायायला, माणसायला, लेकरायला त्या गवतात हगायला जावं लागतं. खायला भेटल्यार गवतातल्या माश्या, कीड़े टनक हुतात अन वारं आलं कि गावात शिरतात. त्याहिचा मोर्चा पाण्याकड़ं वळला कि लोकायाला हगवनी लागतात मंग ते अजुन गवतात जातात अन माश्या-किड्यायला अजुन टनक करतात.
हे असलं चक्र चालु झालं की मही परेशानी चालु व्हती. सलायणीच्या बाटल्या आणाव्या लागतात, खाटं वाढावी लागतात. त्यांच्यात अजुन कही गोळया इंजिकशनं कमी पलड़ी की मंग तालुक्याला पळावं लागतं. मंग अश्या टायमाला पेशंट लोकायचे हाल होउ नै मनुन अन त्याहिनी वरल्या आळीच्या डाक्टरकडं जाउ नै मनुन म्या मह्या सख्ख्या बायकुला दुकानात हे मजी आपलं दावखान्यात बसिवतो. तीसरीपोतच साळा शिकल्यामुळं तिला अजुन अक्षरं फूटत नैत तव्हां गावातल्याच् एखाद्या पाचवी सहवीच्या पोराला दहा इस रुपये दिउन तिच्याबर, गोळयाच्या बरन्यावरची नावं वाचाया बसिवतो.
पर पेशंटच्या शेवेत कसलीच कमी पडु देत नाय.
तिला बी आता दावखाना चालाया जमतुया मनुन सगळा पाउसकळा आमी एक बी गीरायिक मजी आपलं पेशंट भाईर जाउ देत नै.
तसं मागल्या एका पाऊसकळयात तिच्याकडून उलशिक गड़बड़ झालती पर म्या समदं निपटुन कालढं.

त्याचं झालं असं की म्या गेलतु तालुक्याला. ति दावखाना उघडून बसलेली. तेवढ्यात एक हगवन मजी गैस्ट्रो होऊन हातघइला आलेलं पेशंट आलं. तिला बिचारीला वाटलं, हे पेशंट सलायन लाउन इथच तासभर ठुलं त् साऱ्या गादिवर हागुण ठुइन अन मंग आपल्यालाच धुइत बसावं लागन. मनुन त्या पेशंटला, आडमिट नै करता, तिना एक गिलासभर सलायन प्यायला दिली. आता ति बिचारी अडानी तिला काय कळतय! पर त्या पेशंटला अक्कल नवती का? त्यानं कश्याला प्यावी? ते गधाडं गटा गटा सलायन पेलं् अन लागलं वकायला. डोळे गिळे पांढरं करुन पलडं. पर तेवढ्यात म्या आलु मनुन जमलं. सरपंचाच्या स्कारपीओत घालुन तेला अर्जेंट तालुक्याला नेला.
मजी सांगायचं हेच की ति बी असल्या छोट्या छोट्या गोस्टीतुन चांगलीच हुशार झालीय. त् हेव असा पाउसकळा. आता तेच्यात बी कही शेहरात जाउन आलेली शेकड़ी लोकं हाइत. लै शिष्ट. सारखी ग्रामपंचयतीच्या मागं लागतात. आता पगारी जरी भेटत असल्या तरि त्याहिचा जनम काय लोकायाच्या नाल्या- मुताऱ्या काढायसटी आणि लोकायच्या हमाली करायसटी झालाय काय?
माणुसच् माणसाच्या घाणी कामुन काढ़नार?
पर ती शेकड़ी ऐकत नैत, नाल्या काढुनच घेतात.
ही असली शेकड़ी सोलडी तर बाकी भारत ग्रेटच्!
इथला हवामान बी ग्रेट!
इथला पाउसकळा बी ग्रेट!

# बाब्या

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 17/01/2016 - 23:56

गावापासुन पुण्यापर्यंतचा प्रवास त्यानं रेल्वेनं केलेला. पुण्याला उतरल्यावर थोडा चेंज म्हणुन, पुढचा प्रवास बसने करायचा त्यानं बेत केला. लग्नाचे वय झाल्यापासून त्याचा असा 'चेंज'चा उत्साह फारच वाढलेला. रेल्वेचं कल्याणपर्यंतच तिकीट सोडून एशियाड गाठली. रेल्वेत अंग पार ताठरुन गेले होते, इथे मस्त मऊ मऊ सिट मिळालं.
शेजारी एक गृहस्थ म.टा. वाचत बसलेले. मुख्य पान ते वाचत होते आणि बाकीची पानं त्यांनी मांडीवर ठेवलेली.

त्यानं, न विचारताच त्यातलं एक पान घेतलं आणि वाचत बसला. गृहस्तांनी चष्म्याच्यावरून एक तिरकस कटाक्ष टाकून त्याला न्याहाळले आणि परत पेपर वाचन्यात मग्न झाले.
त्यांना एक बातमी वाचेपर्यंत त्यानं उर्वरित सर्व पानं एक एक करत पाहुन (अथवा वाचुन) परत ठेवली.
गृहस्त हातातलेच पान वाचत होते. तो थोडा तिरका बसला आणि त्यांच्या हातातले पान वाचु लागला. थोडं सरकत आणि थोडं खाली वाकत त्यानं त्या पानाची एक बाजु वाचुन काढली.
मग थोडं इकडं तिकड़ं पाहिलं आणि त्या गृहस्तांकडे पाहिले, ते वाचण्यात दंग होते.
मग त्यानं केसावरून हात फिरवला आणि परत त्यांच्याकडे पाहिले, ते वाचण्यात दंग.
मग त्यानं घुडघ्यावर हात ठेवुन बोटाने कुठलीतरि चाल वाजवली आणि त्यांच्याकडे पाहिले, ते दंगच्.
मग दोन्ही हातांची बोटे मोडली आणि त्यांच्याकडे पाहिले, त्यांची नजर पेपरवरच.
मग तो थोडा खाली वाकला, त्यांच्या हातातल्या पानाचा खालचा कोपरा स्वतःकडे केला आणि वाचु लागला. त्यांनी मान खाली करून, चष्म्याच्यावरून त्याच्याकडे पाहत विरोध दर्शावाला तरि तो वाचतच होता. त्यांनी शांतपणे हातातल्या पानाची घडी केली आणि त्याच्या हातात दिली. त्यानं ते पान हातात घेतलं आणि वाचण्यात गढुन गेला.
"सरकारने हि सगळी डोंगरं, झाडं साफ़ करुन शेतकऱ्यांना तिथे शेतीसाठी उपयुक्त अश्या जमीनी तयार करुन द्यायला पाहीजी" हातातल्या पानाची पुंगळी करुन तिनाच् खिड़की बाहेराचा नजारा दाखवत तो बोलला.
त्याच्या हातातलि पुंगळी घेऊन पान सरळ करत करत त्यांनी चष्म्याच्यावरून एक जळजळीत कटाक्ष त्याच्यावर टाकला.
"हिकडं पानी बी भरपुर दिस्तय" तो खिड़कीतून बाहेर पाहत परत बोलला.
बाहेरच्या मोठ मोठाल्या दऱ्या टोपल्याने माती टाकुन बुजवायचं आणि अडदांड डोंगरं पहारिणे फोडायचं काम स्वतःकड़े आल्याचं टेंशन चेहऱ्यावर आनत त्यांनी त्याच्याकडे बघितले आणि डोळे मिटवुन टेकुन बसले.
त्यांच्याकडे पाहुन तोंडात आलेले शब्द गिळत तो ही शांत बसला.
त्यांना चांगली झोप लागलेली. लोणावळा स्टेशनवर गाडी थांबली. चिक्किवाले आत शिरले तसं त्यानं त्या म.टा.वाल्या बाबांना जोराने हलवले. त्यांना शांत झोप लागलेली. त्यानं अचानकपने हाताला दिलेल्या झटक्यानं ते ताटकन उठून बसले.
"काहे?" त्यांनी चिडक्या स्वरात विचारले.
"इथली चिक्की खुप फेमस आहे" तो.
"मग घ्या की दोन चार किलो. मला कश्याला उठवताय?" ते अणखी जास्त चिडुन बोलले.
"नाही... मला वाटले तुम्हाला.. अ.. माहित नसल.. म्ह..नुन सांगितले" तो.
मटावाले उठले तोंडावर पानी मारून, रुमालाने तोंड पुसत परत जागेवर येऊन बसले.
गाडीने वेग घेतल्यानंतर तो परत रिलॅक्स झाला.

"ती शेवटच्या पानावर बातमी आहे की, 'एका बाईने एकाचवेळी सात मुलांना.."
"हो वाचलीय मी" त्याला मधेच तोडत ते एकदम कड़क आवाजात बोलले.
"नाही..तसं नाही.. म्हणजे खरं असल का हो ते..?"
"आता ते मला काय माहित?" ते आणखी कड़क पण चिडक्या स्वरात बोलले.
"नाही.. ते तुमच्या पेपरात.."
"माझा पेपर?. मी विकत घेतलाय... म्हणजे साऱ्या बातम्या मीच छापल्यात का? आणि जास्तच माहिती हवी असेल त् तो पत्ता लिहुन घ्या आणि जा तिथे.. आणि खुद्द त्या बाइलाच या विचारुण" बाबा आता जास्तच चिडले होते.
उजव्या बोटांच्या नखांना डाव्या बोटांच्या नखांनी घासत तो तसाच बसुन राहिला.
पंधरा विस मिनिटांनंतर त्यांनी बॅगमधुन चिप्सचा पुडा काढला. एक दोन चिप्स खाऊन झाल्यानंतर त्यांनी पुडा त्याच्यासमोर धरला.
तो परत रिलॅक्स झाला.
"आपण मुळचे कुठले आहात?" पुड्यातला एक चिप्स तोंडात टाकत त्यानं विचारलं.
"इथलाच" त्याच्याकडे न पाहताच त्यांनी उत्तर दिलं.
गोंधळून खिड़कीतून बाहेरचि मोठाली डोंगरझाडी पाहत त्यानं चावलेला चिप्स गिळला.
ते स्वतःच्या तोंडाजवळ पुडा धरून खात होते. तोंडाला चिप्सचि चव आलेली. त्याचा हात आपसुक पुड्याजवळ गेला. दोन बोटें पुड़यात फिरलि. एक ही चिप्स शिल्लक नव्हता.
मोकळ्या पुड्यात बोट फिरवत त्यानं त्यांच्याकडे पाहिले. ते त्यालाच निरखत होते. त्यानं चटकन हात मागे घेतला आणि खाली मान घालुन बसला.
त्याला देण्यासाठी बॅग मधला दुसरा पुडा काढायला ते खाली वाकले, तसा ड्राईवरने अचानक ब्रेक मारला. समोरच्या शीट च्या दांडीवर चष्मा अदळला आणि काचेला तडा गेला. हातातला पुडा त्याच्या अंगावर फेकुन, तड़कलेला चष्मा डोळयावर लाउन ते शांत बसले.
त्याला खुप वाइट वाटले. काच तुटली म्हणजे शे दिडशेचे तरी नुकसान झालेच असणार.
"काय करता हो आपण?" हातातला पुडा खाऊन झाल्यानंतर पँटला हात पुसत त्यानं शांतपणे विचारलं.
"काय करायच्या हो तुमाला नुसत्या चौकश्या? बसमधे बसल्या पासून नुसती बुळ बुळ लावलिय" ते चांगलेच तापले.
"नाही.. हो.. आपली अशीच ओळख म्हणून आणि गप्पात वेळ पण लवकर जातो म्हणून..."
"डोळे मिटुन पड़ा की गपगार!.. मग जातो वेळ लवकर! लवकर!" ते खुपच चिडलेले.
"तुम्हाला मानुसकीच नाही फारच मानुसघाने दिसताय तुम्ही" म्हणत तो डोळे मिटवुन बसला.
'मानुसघाणा' हा शब्द ऐकून ते चांगलेच चवताळले. त्याच्या एक कानाखाली वाजवावी म्हणून उभा राहिले आणि त्याचे बंद डोळे पाहुन चरफटत खाली बसले.
त्याला चांगलीच झोप लागलेली. वाहकाने उठवले तेव्हा सर्व प्रवासी उतरून गेलेले. तो ही उतरला. कल्याण बस स्टॅंडच्या बाहेर येऊन तो रेल्वे स्टेशनमधे घुसला.

"हेलो..मामा, मी बोलतोय. मी आलोय इथे कल्याणला"
"बरं! बरं! अता लोकल पकड़ आणि डोम्बिवलित उतरुन वेस्टला एक्सिस च्या ए टी एम जवळ थांब, मी आलोच" मामा.
"हो, हो"
मामाशी बोलत बोलत तो प्लेटफॉर्मवर येऊन पोहचला.
प्रवास्यांची वाट पाहत उभा असलेली 'ठाणे स्लो' पकडून तो डोंबिवलीत उतरला.
मागच्या वेळेस तो ठाण्याहून डोंबिवलीला आलेला. तेव्हा 'वेस्ट' उजव्या हाताला होते की डाव्या हाताला, त्याला काहीच अठवेना. जवळ काही बोर्ड किंवा ओळखीची काही खून पण दिसेना. तिथे उभा असलेल्या एकाला विचारले. तो म्हणाला;
"ओ उदर सीडी है, उससे चढ़कर ओ बाजू में जाव"
तो तसाच एका बाजुने चालु लागला. पायऱ्या जवळ आल्यावर परत खात्री करुन घ्यावी म्हणुन, हातात कोट धरून रेल्वे रूममधे घुसणाऱ्या एकाला त्याने परत विचारले;
"साब, डोंबीवली वेस्ट ओ बाजुमे है ना?"
"हा..हा..कहासे आये हो" म्हणत तो कोटवाला जवळ आला.
तो रेल्वे टीसी होता. तो तिकीट दाखव म्हटल्यावर आपण तिकीट काढलं नसल्याची त्याला आठवण झाली.
तिकीट नाही म्हटल्यावर टीसीने त्याला हाताला धरून बाजूला नेले. मामा इथेच कुठेतरी वाट पाहत असल, त्याच्या ही गोष्ट लक्षात यायला नको म्हणुन, टीसीचा हात सोडवत तो हळूच म्हणाला;
"साब, ये लो पचास रूपया, जाने दो"
"मेरे को रीश्वत देता है क्या रे" म्हणत टीसीने त्याला आणखी घट्ट धरले.
"साब, रिश्वत नहीं ऐसे ही कॉपरेट कर रहा था" तो.
"तो चल फिर अंदर, उधर बड़े साब के सामने कर कोपरेट" टीसीने त्याला एका कोपऱ्यात नेले.
कसा बसा दोनशे रुपये देऊन त्यानं हात सोडून घेतला आणि वापस फिरला त् मामा तिथेच त्याच्याकडे पाहत उभा.
"तिकीट काढायला काय झालतं रे तुला?, लग्नाचं वय झालय् हा बावळटपणा सोडा आता" मामा रागातच बोलला आणि चालाया लागला.
घरी आल्यावर मामाणे चटकन फ्रेश व्हायला सांगितले.
फ्रेश झाल्यावर मामा त्याला मागे गाडीवर बसवुन बाहेर घेऊन गेले.
एका मोठ्या इमरतीच्या पार्किंगमधे गाडी लाउन दोघे लिफ्टमधे घुसले.
"बापाचे ते अचाट कर्तुत्व आणि तुमचे हे असले उद्योग. अख्ख्या पंचक्रोशित तुला कुणी पोरगी द्यायना. अता बहिनीकडे पाहुन तुझ्यासाठी हे स्थळ आनलय. चुपचाप बसुन रहा, तोंड उघडु नकोस. पोरगी चांगली आहे. तु फ़क्त विचारले तेवढेच बोल. बाकी मी बोलतो काय बोलायचे ते....." लिफ्ट पाचव्या मजल्यावर जाईपर्यंत मामाचे सुचना देने चालुच होते.

पाचव्या मजल्यावरच्या एका फ्लॅट जवळ गेल्यावर दरवाज्या जवळच्या खिड़कीतून आत दाखवत मामा बोलू लागले;
"ते बघ, आत पेपर वाचताय ते मुलीचे वडील. आत गेल्या गेल्या त्यांचे दर्शन घे"
मामा डोर बेल वाजवायला पुढे सरकले तशी त्याची आत नजर गेली.
आंत सोफ्यावर, तड़कलेला चष्मा घालून म.टा. वाचत बसलेल्या त्या गृहस्थाला पाहुन, मामाला पायातले बूट काढेपर्यंत तो मागचं मागेच पळाला ते थेट कल्याणकडे जाणाऱ्या लोकलमधेच जाऊन थांबला.

# सुभ्या

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 10/01/2016 - 02:34

पाठीत धापकन् बुक्का बसला तेव्हा सुभ्या खड़बडून जागा झाला.
"कारे गाढवा! इ.भु.ना. चा तास म्हणजे काय झोपायचा तास वाटतो काय रे तुला!" गुरुजी मोठ्याने त्याच्या कानाजवळ येऊन खेकसले.
तो, त्याच्या अगोदारचा म्हणजे मराठीच्या वालावलकर बाईचा तास चालु झाला तेव्हा झोपलेला, इ.भु.ना. च्या कोंडुळे गुरुजींना समोर पाहुन पुरता गोंधळला.
"असा अफजल खान पाहिल्यावानी काय बघतोयस? चल ताजमहल कुणी बांधला सांग लवकर?"
सगळा वर्ग त्याच्यावर डोळा लाउन बसलेला आणि त्याची खाली बाकावर चुरगळलेले मराठीचे पुस्तक सरळ करण्याची धांदल.
"इ.भू.ना. च्या तासाला मराठीचे पुस्तक काय रे गढवा?" गुरुजींनी परत एक बुक्का घातला. सगळा वर्ग तोंडावर हात ठेऊन दबकत दबकत हसु लागला. गुरुजींनी मान फिरवुन सगळया वर्गावर नजर टाकली. सगळा वर्ग चिड़ीचुप.

"जा, मागच्या बाकावर जाऊन उभा रहा"
त्याने बाकाच्या खाली हात घालुन हळुच आपला जाड भिंगाचा चष्मा काढला. काच पुसुन डोळयावर चढवला. मराठीचे पुस्तक दप्तरात व्यवस्थित ठेवुन इतिहासाचे पुस्तक काढले.
"जातो की नाही लवकर? का घालु आणखी एक गुद्दा?" पुढे गेलेले गुरूजी वापस फ़िरले तसा तो हातात इतिहासाचे पुस्तक घेऊन मागच्या बाकाकडे धावला.
खिड़की जवळचा तो रिकामा बाकडा. मागच्या, टेकायाच्या फळीला धरून तो बाकावर चढला.
गुढग्या पर्यंत आलेले पांढरे शुभ्र मोज़े, काळे बुट, खाकी चड्डी आणि पांढरा हाफ शर्ट घातलेला सुभ्या हातात इतिहासाचे पुस्तक उघडुन् बाकावर उभा राहिला.
शाळा जुनी, रंग उडालेल्या जुनाट भिंती, कात्तुन पडलेले उन्ह, बाहेर उभा राहिलेली केविलवानी झाडं, कोंडुळयांची चाललेली बडबड. सगळे वातावरणाच् मरगळलेले.
तेवढ्यात सुभ्या जवळच्या खिड़कीतुन दोन चिमन्या आत शिरल्या. चिमन्या म्हणजे काय त्यांच्यासाठी नविन नव्हत्या, त्या सगळयाच तासांना वर्गात हजर असतात. इंग्रजीच्या तासाला तर कथवडे मॅडम पेक्षा त्या चिमन्यांचाच आवाज जास्त असतो.
खिडकीतून आलेल्या दोन चिमन्यापैकी एक खिड़कीच्या गजावर बसली तर दुसरी वरच्या तावदानात अर्धवट राहिलेला खोपा विनन्यात दंग झाली. पण चिवचिवाट चालुच. सुभ्या बळेच गुरुजींच्या शिकवन्याकडे ध्यान देण्याचा प्रयत्न करू लागला तसा खिड़कीजवळच्या चिमनीचा जास्त त्रास होऊ लागला. त्यानं एकदा पुस्तक उगारुण तिला हुसकावन्याचा प्रयत्न केला पण गुरुजींच्या ते नजरेत आले.
"सुभ्या, वळवळ करू नकोस नाहीतर फोडुन काढिन"
सुभ्या निमुटपणे उभा राहिला. चिमनीचा चिवचिवाट वाढला मग तो गुरुजींची पाठ फिरली की तिच्यावर धाउन जायचा. ति उडायची आणि परत तिथेच येऊन बसायची.
थोड्यावेळाने वरची चिमणिपन खाली आली.
तिचे वर खाली चालु झाले. खाली येताना आणि परत वर जाताना ति सुभ्याच्या डोक्याला पार खेटुन जायची. तो गुरुजीची पाठ फिरायची वाट पाहु लागला. तो एका हातात पुस्तक धरून तयारित उभा होता.
कोंडुळे गुरूजी शिकवत शिकवत सुभ्याजवळ आले आणि फिरले. त्यांच् वापस फिरणे आणि चिमणिचे जवळ येणे एकच झाले. या वेळेस गजावरची चिमनी आत उडाली होती. ति जवळ आली तसं सुभ्यानं हातातलं पुस्तक जोरात फिरवलं. चिमनी निसटली तसा तो गडबडला. बाकावरचा एक पाय सटकला आणि हातासहित पुस्तक गुरुजींच्या टाळक्यात आदळले. सुभ्या खाली पडला.
चिडलेल्या गुरुजींनी संयम राखत त्याला उचलले. बाकावर बसउन कुठे जखम झाली का ते विचारले. त्याला काहीच झाले नव्हते, गुरुजींनी मुठ वळून त्याच्या पाठीत बुक्का घातला. तेव्हड्यात टोल पण वाजला.
"दुपारच्या सुट्टीनंतरचा पहिला तास माझाच आहे. आत्ता शिकवलेल्या धड्याखालच्या सर्व प्रश्नांची उत्तरे तुझ्या वहित लिहून पाहिजेत, नाहीतर तुझी काही खैर नाही"

होकरार्थी मान हलवून तो गुरुजींकडे पाहत उभा राहिला.
"कसला निबार झालाय. त्याला कितीही फटकवलं तरि डोळयाला थेंब येत नाही" म्हणत गुरूजी निघुन गेले.
पुढचा तास परत मराठीचा.
वालावलकरबाई डुलत डुलत वर्गात येईपर्यंत सुभ्या दप्तर घेऊन थेट मागच्या बाकवर येऊन बसला.
बाई वर्गात येऊन खुर्चीत बसल्या की टोल वाजल्यावरच उठतात. आज त्यांनी कविता शिकवायला घेतली. म्हणजे पंधरा मिनिटांत कविता संपणार आणि नंतर आराम.
सुभ्या ने इतिहासाचे गाईड उघडून बाकवर ठेवले आणि लिहायला सुरुवात केली. कविता रंगात आली आणि संपूण गेली. नंतर बाई मोबाइलला डीवचत बसलेल्या बाकी वर्गभर चूळबुळ चालु होती. सुभ्याचे दोन तिन प्रश्न लिहून झाले आणि पेन बंद पडला. मग त्याने पेन खोलला, कांडी बाहेर काढली, समोरचा टोक काढला आणि तोंडाने हवा भरू लागला. कांडीच्या समोरून थोडी शाई आली की टोक बसवायचा त्याचा बेत होता. पण समोरून शाईच् येइना म्हणुन त्याने जोरात फुकले तशी कांडीतली शाई भरकन समोरच्या बाकावर बसलेल्या अडदांड पोराच्या मानेवर पडली. त्याचा सदरापन भरला. त्याने उठून सुभ्याला एक बुक्का घातला. सुभ्या जागीच कोलमडून पडला.
मागच्या बाकावरची गड़बड़ बाईंच्या लक्षात आली. त्या सुभ्याजवळ येऊन उभा राहिल्या.
"मराठीच्या तासाला इतिहासाचा अभ्यास करतोस काय रे गाढवा?" म्हणत बाईंनी त्याला एक झापड़ मारली आणि बाकावर उभा रहायला सांगितले.
दुपाराच्या सुट्टीत सगळा वर्ग बाहेर खेळायला गेला. त्यानं वर्गात बसुन इतिहासाची प्रश्न उत्तरे लिहिली. लिहायचे संपले तेव्हा वर्ग भरायला पाच मिनिट बाकी होते. त्यानं डब्बा काढला आणि मुली बसतात त्या कोपऱ्यातल्या बाकावर जाऊन बसला. एका डब्ब्यात आईने दही दिलेले. त्यानं तो दहयाचा डब्बा उघडला आणि त्याला आठवले, आई सकाळी म्हणत होती "दही पिऊ नकोस वर्गात झोप येईल" पण त्यानं तिचे ऐकले नव्हते. अता पुन्हा इतिहासाचा तास असल्यामुळे दहयाचा उघडलेला डब्बा त्यानं तसाच बाजूला ठेवला. आणि भाजीपोळी खाऊ लागला. एखादी पोळी खाऊन झाली असेल तोच दोन चार पोरं "कोंडुळया आला" म्हणत वर्गात घुसली. सुभ्याचा गोंधळ उडाला. डब्बा लावायाच्या गडबडित डब्यातले सारे दही बाकावर सांडले. तो धावतच स्वतःच्या बाकाजवाळ आला, वहिचे पान फाडले आणि हातात डब्बा घेऊन तसाच सांडलेले दही पुसायला 'त्या' बाकाकड़े पळाला. कोंडुळे गुरूजी वर्गात घुसले तशी सगळी मुलं मूली वर्गात घुसलेली. सुभ्या "थांबा" म्हणत होता तेवढ्यात दोन मुली बाकावर बसल्या आणि खालचा ओलावा जानवला तश्या त्या ताटकन उभा राहिल्या. त्यांना मागे, हातात दह्याचा डब्बा घेऊन उभा ठाकलेला सुभ्या दिसला तश्या त्या किंचाळल्या आणि
"गुर्जी, ह्या सुभ्यानी आमच्या खाली दही फेकलं" म्हणत मोठ्याने रडु लागल्या.

# रिप्लेसमेंट

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 03/01/2016 - 02:24

हजाराच्या सात नोटा त्यानं मोजुन पाकिटात ठेवल्या आणि बाबुच्या टपरिवर येऊन उभा राहिला.
"भाऊ, एक 'बार' मळा बर् आपल्याला"
"पगार झाली दिस्ती आज?" बाबुने खोचकपणे विचारले.
त्याचं लक्ष नव्हतं.
तालुक्याच्या बस स्टँडवर ति मैत्रिणींच्या घोळक्यात उभी होती. तो तिच्यावरच नजर लाउन उभा होता.
अर्धा बार तोंडात टाकला आणि अर्धा व्यवस्थित पाकिटात ठेऊन तो तिथेच उभा राहिला. बाबु आणखी काहीतरी बोलला पण त्याचे ध्यान 'ति'कडेच लागलेले.
थोडयावेळाने टपरीच्या पायावर पिचकारी मारून, तोंडातला बार चघळत आणि छाती पुढे काढत तो तिच्या जवळ येऊन उभा ठाकला. तिना मान फिरवली. खरे तर ति घाबरलेली पण शांत उभा होती.
दोन्ही हात खिशात घालत त्यानं जमिनीवर एक पिचकारी मारली आणि तिला "आय ला ब्यु" म्हणाला ति जास्तच टरकली. मैत्रिणी बिचकल्या. त्यानं खिशातून एक चिठ्ठी काढली, बळेचतिच्या हातात कोम्बली आणि पुन्हा टपरीवर जाऊन उभा राहिला.
तो पहात होता, ति खाली मान घालुन उभा होती. तेवढ्यात बस आली मैत्रिनिंसोबत ति बस मधे चढली. सगळया शांत होत्या. तो रोज तिला पहायचा, सकाळीच टपरिवर येऊन उभा राहायचा, रोज स्टॅण्डपासून कॉलेज पर्यंत तिच्यावर पाळत ठेवायचा. पण आज त्यानं कहरच केलेला. बस स्टॅण्डवर गावातली बरीच लोक होती. तिला रडायला आले. ति मांडीवरच्या बॅग मधे तोंड लपवुण बसली. बस चालु झाली. तिना मोकळा श्वास घ्यायला मान वर केली तेवढ्यात तो गपकन खिड़कित आला. सिगारेटच्या खोक्याचा तुकडा तिच्या अंगावर टाकत बोलला;
"चिट्टित मोबाइल नंबर लिवायचा इसरलु! हेव घी अन् रातच्याला रिंग मार!"
बस निघुन गेली. तो खोलीवर आला. येताना बियरची बाटली, चिकन फ्राइड राइस आणि एक सिगारेट पाकिट घेऊन आला. चिट्ठी दिल्यापासूनचा त्याचा सगळा टाइम फूल टेंशन मधे चाललेला. साडे आठ नउच्या दरम्यान त्याला एक बारीक मिसकॉल आला. मोबाइल त्याच्या हातातच त्यानं लगेच वापस फोन केला.
"हेलो, ....मी बोलत्याय..."
"हा..हा.. अगं म्याच् बोलतुय...कव्हाधरणं तोह्याच् फोनची वाट बघतुय.." त्याला खुपच मोकळं वाटु लागलेलं.
"मी पण फोन लावन म्हणते किती वेळा पासुन पण ..जाऊ दे.. बोल ना?"
"लाइफ मदि पैल्यान्दा तूहा आवाज ऐकतुया.. तू आयला ब्यु मन ना एक बार.."
"बर बाबा ..आय लव यु.."

दोघे बराच वेळ बोलत होती. ति "उद्या कुठेतरी फिरायला जाऊ" म्हटल्यावर तो "हो" म्हणाला. भेटायची वेळ व ठिकाण फिक्स करुन त्यानं फोन कट केला आणि दुसरा नंबर डायल केला.
"हालो, राजाभौ.. उद्याच्याला कामाव् यायला नै जमनार"
"सालं तुमच्या पगारिच नै काराय पायजी. खिशात उलशिक पैसा आला की डिंगरता"
"भौ घ्या न् उद्याच्या दिस अड़जस करुन.."
"तु परा दिसी येऊ नगस मंग सांगतु तुला.." म्हणत राजाभाऊ ने फोन कट केला.
त्यानं दुसरा एक नंबर डायल केला.
"हालो, किरण्या.. आपल्याला तोह्यावाली गाड़ी पायजी हुती उद्याच्या पुरती.. जरा आयटम ला फिरुन अनायची..."
"अरं जा की घिउन मंग.. त्यात काय इचारायचं" किरण.
"सकाळच्याला येतु मंग..."
"पर थोडं लवकर यी...त्याचं काहे बग... गाडी लए दिस ची पडुन हाय.. थोडं टायर बियर तपासुन घी... गारेजातून.."
"बरं बघतु म्या.. पगार बी झालिया.."
पहाटे पाचलाच उठुन त्याने अवरा अवरी केली. गैरेजवाल्या पप्याला उठुन आणले. गाडीचे दोन्हीं ट्यूब बदलावे लागले, चैन कट करावी लागली, एक दोन वायर चे तुकडे बदलले. पप्याने सकाळी सकाळीच् ८५० रूपायाची बोहनी करुन घेतली. किरण्या म्हणाला "तोहयाचानि होत नसल त् पडु दे तशीच" मग दिले पैसे काढुन.
ठरल्या प्रमाणे तो वडगाव रोडवरच्या चिंचेखाली गाडी घेऊन उभा राहिला.
ठरलेली वेळ टळून गेलेली. ति अजुन आलिच नव्हती. टेंशन वाढले. मावा तोंडात टाकून तो चिंचेच्या बुडाशी पिचकाऱ्या हानत बसला. तेवढ्यात एक हिरवा पंजाबी घातलेली आणि तोंड रुमालाने गच्च आवळलेली मुलगी येताना दिसली. त्याच्या जीवत जीव आला. ति जवळ आली तो हसरा चेहरा करुन जोरजोरात मावा चघळत उभा राहिला. तिना तोंडावरचा रुमाल सोडाला. त्याची शीर सटकली. खाली पिचकारी मारून, तोंड घट्ट मिटवुन, भुत दिसल्यागत तो तिच्याकडे पाहु लागला. ति आलिच नव्हती. हि 'ति'ची मैत्रीण.
"तिला तू बिलकुल पण अवडत नाहीस. तिना काल बस मधेच तुझी चिट्ठी फाडली.."
"...अन मंग..रातच्याला मोबाइलवर कस। काय गुलु गुलु बोल्ली..?"
"राति मीच बोलत होते. मला तु खुप खुप अवडतोस. तु आमच्या मागे फिरायचास तेव्हा मीच तुझ्याकडे पहायचे. तिला तुझा खुप राग येतो..."
चिंचेच्या बुडावर पिचकारी मारून, तोंडातली तंबाखू-सुपारी थुंकुन तो एकदम मुड मधे येत बोलु लागला;
"... अर्र एकदम बराबर! तरि आपल्याला डाउट अल्ताच..त्या दिसच्याला त्वा वळून पायलं कि लगीच मनलं तोहि लाइन अपल्यावरच असणार... बर् झालं त्वा सांगुन टाकलं"
"जाऊ दी. ति खुप भित्री आहे आणि तिचे भाऊ पण खुप डेंजर आहेत"

"आता त्वा आपल्यावर जीव टाकला मंग कह्याला तिच्या मांगण् फिरू?"
दोघे बराच वेळ गप्पा मारत बसले. नंतर तिच्या इच्छे नुसार मॉलमधे जायचे ठरले.
तिना परत चेहरा स्कार्फ़ने आवळला. त्यानं पाकिटातून उरलेला बार काढुन तोंडात टाकला.
"जानु, तू ते काय खातोस ना.. ते चावताना लै झाक दिसतोस... एकदम डेरिंगबाज.."
तोआतून खुश होत लाजला.
मॉलच्या पायऱ्या चढताना त्यानं तिच्या खांद्यावर हात टाकला. तिना त्याला बाजुला सारले.
"जानु, प्लीज् मला टच नको करु. मी अजारी आहे. कसली तरि एलर्जी का काय ते झालय. कुणी टच केलं की आग आग होते"
"ओक्के डार्लिंग! आपुन नाय टच करणार... खुश?" म्हणत तो बाजुला झाला.
"जानु, प्लीज नाराज नाको ना होउस"
"नाय गं डार्लिंग.."
दोघे आंत शिरली. लेडीज़ वेअर च्या टॉप घातलेल्या पुतळया जवळ आल्यावर तिना पर्समधुन एक 'सेलो ग्रिफर' चा पेन काढुन त्याच्या हातात दिला.
"जानु, तुला माझ्याकडून पहिली भेट"
"हेव पेन? अन आपल्याला?" तो एकदम हळवा होत बोलू लागला; "डार्लिंग, लाइफमंदि आपल्याला पहिल्यांदा गिफ्ट भेटला...बोल तोहयासाटी काय घिउ?"
"जानु, मला काय नको..." म्हणत ति पूतळयाला घातलेल्या टॉपचं कापड पाहु लागली.
त्यानं तिथल्या पोरिला तो टॉप पॅक करायला सांगितला. एका टॉपची किम्मत आठराशे रुपये! त्याला भवळच् आलेली पण कसेबसे तोंडावरचे भाव सांभाळत त्याने बिल भरले.
थोडावेळ इकडे तिकडे भटकुन झाल्यावर तिला भुक लागली. त्याने दोन वडापावची आर्डर दिली.
"थांब जानु, माझ्याकडे आहेत पैसे आपण पिझ्झा घेऊ" तिना पर्सची चैन ओढ़ायाचा प्रयत्न केला.
"डार्लिंग, म्या हाइना! " म्हणत त्यानं खसकन हजाराची नोट काढुन काउंटरवर ठेवली.
वापस आलेले पैसे मोजताना त्याला समजले कि, तिना मागितलेल्या पिज्जाची किम्मत साढेचारशे आहे. दोघे बराच वेळ खात होते, ति सकाळपासुन उपाशी असल्यावानी आणि तो पिज़्ज़ा उरला तर पैसे वापस मिळणार असल्यावानी.
परतीच्या वाटेने एका चौकात ट्राफ़िक पोलिसला पाहुण त्यानं गाडीचा रेस वाढवला तर ति जोराने "थांब, थांब" म्हणुन ओरडली.
"डार्लिंग, काय झालं?"
"माझा मोबाईल टेबलवरच राहिला वाटतं..." पुटपुटत् ति पर्स चाफु लागली. तेवढ्यात पोलिसभाऊ जवळ येऊन उभा राहिले.
"अरे, आहे! चल आता" ति गाडीवर बसली. आणि पोलिसभाऊंनी गाडीची चावी हातात घेतली. जानु जवळ लायसेंस नव्हते, सायलंसर भरून धुर काढणाऱ्या गाडीचं पीयुसी

नव्हतं, गाडीची अर्धी नंबर प्लेट पुसलेली. त्यानं घाबरत घाबरत शंभरची नोट काढुन साहेबांच्या हातात कोम्बली आणि सटकला.
"जानु, उदया किती वाजता भेटशील रे?" बसस्टँड वर उतरताना ति म्हणाली.
" डार्लींग, डायरेक् संडेला भेटुना"
"हे काय रे, जानु? उद्या माझा बड्डे आहे" ति लाडात येत बोलली.
"बर् ठिकाय उद्याच्याला करतु मैनेज... खुश?"
खोलीवर गेल्यावर त्यानं पहिला राजाभाऊ ला फोन लावला.राजाभाऊ कसेतरी सुट्टी द्यायला तयार झाले पण "परादिसच्याला कामावर नै दिसला त् कायमचा घरीच ठुइल" म्हणाले.
दुसऱ्या दिवशी गडद निळी जीन्स आणि भड़क लाल शर्ट घालुन तो मावा चघळत चिंचेखाली बसला होता. समोरुण येणारा तोंड बांधलेल्या पोरींचा घोळका पाहुन तो उभा राहीला.
"यां माझ्या मैत्रिणी, यांची खुपच इच्छा झाली होती तुला पहायची" ति तोंडावरचा रुमाल सोडत बोलली. तो लाजुन इकडे तिकडे पाहु लागला.
"भावजी, तुमचा जोड़ा एक नंबर दिसतोय" एक मैत्रीण तोंडावरचा रुमाल न काढताच बोलली.
"भावजी, आज तुमच्या कडून पार्टी पाहिजे बर आम्हाला" सगळयाच एका सुरात ओरडल्या.
"चला मंग हाटलित, आपली फूल तयारी हाय" तो एकदम फार्मात आलेला.
"जाऊ की भावजी दुपारुण, पहेलं् बड्डे गर्ल ला गिफ्ट काय आनलं ते दाखवा" एक मैत्रीण.
"अगं, काल त्यांनी खुप छान टॉप घेतलेला पण काल माझ्याकडून बस मधेच विसरून राहिला" तिच्या या वाक्याचं सर्वात जास्त दुःख त्याला झालं. पण परत तोंडावरचे भाव सांभाळत "जौदे डार्लींग परत दुसरा घिउ" म्हणाला.
तो गाडी पप्याच्या गैरेजवर लाउन आला. नंतर दोन स्पेशल रिक्शा करुन सर्वजन मॉलकड़े निघुन गेले. दुपारपर्यंत सर्व पार्टी वगैरे आटपुन तो खोलीवर पोहचला. त्याचं डोकं दुखायला सुरुवात झालेली. गोधड़ीवर पडून वरचे पत्रे न्याहाळत होता तेवढ्यात तिचा मिसकॉल आला. त्यानं बराच वेळ विचार केला अन मग फोन लावला.
"हेलो जानु, अरे ऐक ना.. मला 'हैप्पी बड्डे'चे खुप मेसेज येताय पण रिप्लाय करायला माझ्याजवळ बॅलेन्सच् नाही.. तेवढं पन्नास साठच् एक रिचार्ज मार ना... प्लीज.."
"ठिकाय" म्हणत त्यानं फोन कट केला.
काही वेळाने तिचा परत मिसकॉल आला. तो तसाच पडून राहिला. रात्रि पर्यंत तिचे सात आठ मिसकॉल पडले. पण तो तिकडे लक्षच देत नव्हता.
तिचे खुपच मिसकॉल येऊ लागले तेव्हा त्याने सिमकार्ड काढले त्याचे दोन तुकडे केले आणि दुसरे सिमकार्ड टाकून राजाभाऊला फोन लावला.
"राजाभौ, म्या उदया येतु कामाला.... हा हेव महा नवा नंबर.. नै नै ते कार्ड हरपले"
झोपताना परत एकदा त्यानं खिशातुन पाकिट काढले. दहा रुपयांच्या तिनच नोटा

शिल्लक होत्या. त्या घडिकरुन पाकिटात ठेवल्या आणि डोक्याला रुमालाने घट्ट आवळून झोपी गेला.
त्यानं बसस्टँडवर हातात चिठ्ठी दिल्या पासुन ति पार भेदरुण गेलेली. दोन दिवस ति कॉलेजला आलिच नव्हती. आजही ति भीत भितच बस मधुन उतरली. भीत भितच तिरप्या नजरेनं तिना टपरिकडे पाहिले. तिथे कुणीच् नव्हते. भीतीने जखडलेले तिचे शरीर अचानक सैल झाले. आपल्या, हिरवा पंजाबी घातलेल्या, बहिणीकडे पाहुन ति मोकळी हसली आणि दोघी एकमेकिंच्या हाताला घट्ट धरून कॉलेजच्या दिशेने निघाल्या.

# मास्तर

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 27/12/2015 - 00:30

शाळेतून निघायला त्याला आज उशिरच झालेला. बसच्या गर्दीत स्वतःला घुसवत कसबसा घरी पोहचला.
तिन वर्षाचा चिमुकला तापाने फनफनलेला. बायको घाबरुण गेलेली. मिठाच्या पाण्यात पट्टया भिजवुन डोक्यावर ठेवत होती.
पण ताप कमी होइणा.
तो आल्या आल्याच चिमुकल्याला दुपट्यात गुंडाळून दवाखान्यात घेऊन निघाला.
बायकोला रडु अवरेना.
डॉक्टरने रक्त तपासायला सांगितले.
अर्ध्या तासाने रिपोर्ट आला. पांढऱ्या पेशी कमी झाल्या होत्या. डॉक्टरांनी तिन दिवस एडमिट करायला सांगितले.
चिमुकल्या हाताला सलायन लावली.
ति ओल्या फडक्याने त्याचं अंग पुसत होती. तो तिथेच डोक्याला हात लावुन बसलेला.
तिच्या पोटात सकाळपासुन अन्नाचा कण नव्हता. तो दुपारी जेवालेला.
रात्रि बारा एकच्या सुमारास ताप निवाला. त्यानं तिथच खाटाला डोकं लाउन उलसिक डुकला घेतला पण ति रात्रभर जागीच होती.
"महा जिव लइ घाबरागुबरा हुतुय, आजच्या दिस सुटी टाका"
"नाही जमनार रे. ठकीच्या लग्नाला सुट्ट्या टाकल्या. अता आज नै गेलो त् आजचा दिवस बिनपगारिच होईल"
"होउद्या, जाउद्या नका जाउ"
"बघतो, जमलं त् हाफ डे टाकून येतो"
" पर, नगा न जाऊ आजच्या दिस"
"अगं! या महिन्यात बराच खर्च झालाय. ठकिला द्यायाला टिव्ही घेतला त्याचे पैशे राहिलेत अजुन द्यायचे. अन् अता आपल्या पिलु ला बी डाक्टर तिन रोज ठोयचं म्हणले

त्याचं बिल कितिक येते काय माहीत"
पहाटेच घरी जाऊन अंघोळ वगैरे उरकुन, पीलुची आवडती मुगाची खिचड़ी बनवुन, ती घेऊन तो परत दवाखान्यात आला.
'लुंदी दान्स लुंदि दान्स' म्हणत अख्ख घर डोक्यावर घेणारा इवलुसा पिलु आज निपचित पडला होता. हात पाय गळून गेलेले. खोल आणि निस्तेज डोळ्यांनी तो बापाकडे पाहत होता.
त्यानं पिलुच्या कपाळावर ओठ टेकले आणि निघाला.
"पपा, इतच् बचाना" केविलवान्या अवाजात पिलुने विनंती केली.
"माज़्या पिल्लाला नवा ड्रेस् अनायचा अन दुकानात पायलेली ती लिमोट ची गाली बी अनायची" बायको कड़े आणि परत पिलुकडे पाह्त "आनायची ना पिलु?"
"नतो मया गाली. तु इतच थांब" पिलुने त्याचं बोट धरलं.
"अहो, म्हनतय लेकरु त् थांबाना" ति मधेच बोलली.
"तुला कसं समजत नहीं रे? उदया परत कही कमी जास्त झालं त् परत सुट्टी मारावी लागल. अश्या दोन दोन बीनपगारी सुट्या पर्वडनार का आपल्याला?" तो काहिश्या चिड़क्या स्वरात बोलला.
ति पिलाला समजावु लागली, तो निघुन गेला.
डायरेक्टर साहेबांची बारां वाजता मिटिंग असल्यामुळे, "मिटिंग संपल्यानंतर जा" असे प्राचार्यांनी सांगितले.
बारां म्हणजे साहिबांना यायला दीड वाजला. आल्या आल्या ते प्राचार्यांच्या कार्यालयात घुसले. तिथे कोल्डड्रिंक्स वगैरे मागवुन झाल्यावर म्हणजे ठीक दोन वाजता साहेब निघुन गेले. मीटिंग हॉल मधे प्राचार्य आणि साहेबांचे ख़ास 'शेलार मामा' आले. "साहेबांना अर्जेंट काम आल्यामुळे जावे लागले" हे व् आणखी इकडचे तिकडचे एक दोन वाक्य बोलुन झाल्यावर मामा मूळ मुद्द्यावर आले:
"पुढच्या महिन्यात आपल्या साहेबांच्या मुलाचे लग्न आहे. साहेबांनी स्वतः त्याला भेट म्हणुन 'मर्सिडीज बेंझ CLS क्लास बुक केली आहे. आपण सर्वजन एकाच कुटुंबाचे घटक आहोत तेव्हा आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे कि आपण ही फूल न फुलाची पाकळी म्हणुन काहीतरी भेट द्यावी. तेव्हा आपल्या सर्वांचा दोन दोन दिवसांचा पगार कापुन सहेबांनी पसंद केलेल्या कार च्या खरेदिला हातभार लावण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे"
तो सर्वात शेवटच्या ओळित एका खुर्चीवर बसलेला. त्याचं डोकं ठनकु लागलं. भरून आलेल्या डोळयात चिमुकल्याचा केविलवाना चेहरा दिसु लागला. "जाऊ नका ना" म्हणत बायकोने पाय धरल्याचा त्याला भास होउ लागला.
मीटिंग संपली सर्वजन बाहेर पडले तरि तो तिथेच बसुन होता. डोळे मिटवुन आणि खुर्चीला घट्ट धरून.

# नौकर

प्रेषक, आनंद कांबीकर, Wed, 16/12/2015 - 23:43

शेवटच्या स्टॉपला बस थांबली. तो कंडक्टर जवळ गेला.
"सायेब, महे पाच रुपै?"
"सुट्टे नाही रे माझ्या जवळ" कंडक्टर त्याच्याकडे न पाहताच गुरकला.
"सायेब, बघा की असलं त्?"
"ओ, सरका की बाजूला. धड़ स्वतः उतरत नाही अन आम्हाला उतरु देत नाही" मागनं येणारी एक बाई चिरकली. तिच्या मागच्या बाईने, पाच रूपडयासाठी हुज्जत घालणाऱ्या 'त्याच्या' वर वंगळ कटाक्ष टाकला. तो थोड़ा सरकला आणि आणखीही काही तसल्याच वंगळ नजरा झेलत तिथेच उभा राहिला.
"जाय खाली टपरीवर काही घ्यायचे असल तर घे, मजी सुट्टे होतील"
"नै सायब, म्या पुडी गिडी खात नै"
"दुसरं काही घे मग"
"सायब, लेकानी मोजकच पैसं दिलतं. कै घेतं त माघरी जायला कमी पडन"
"आन ती पिशवि" कंडक्टर ने त्याच्या हातातली पिशवि स्वतः जवळ घेतली आणि त्याच्या हातात दहाची नोट ठेवत "जाय त्या टपरीवरुण माझ्यासाठी पाच रूपयाची गायछाप आन आणि पाच रुपये तु घी" म्हणाला.
एका हातात बसची दांडी धरत आणि दुसऱ्या हाताने पटका चाचपत म्हतारा खाली उतरला आणि लंगडत लंगडत कोपऱ्यावरच्या पानटपरीच्या दिशेने निघाला.

# पाच्चा ठोकळा

प्रेषक, आनंद कांबीकर, Tue, 15/12/2015 - 00:08

"ये आये, पाच्चा ठोकळा दिना मला"
"लई किरकिर नगस करू. तुला कह्याला रे पाच्चा ठोकळा? चल गुमान्, तेवढ्यात कोथमिरिचि जुडी येईन" म्हणत मायनं, रागातच् त्याला पुढं खेचलं.
तेव व्हरगाडत चालु लागला.
पर त्याची नजर तिकडच हुती, म्हवरं परात मांडून बसलेल्या त्या खप्पड़ म्हताऱ्या कडं.
पुढच्या माळणीजवळ माय वांगं निवडत बसली.
तेव म्हताऱ्याकडच बघत हुता, टाचा उचकुन अन मान तानुन.
माय वांगं पिशीत घिउन उठली अन कोथमिरीवाल्याकडं कोथमिर निवडु लागली.
तेव हळुच माई जवळ येऊन हुभा ठाकला.
मायणं कोथमीर पिशीत टाकली अन झंपरातल्या पाकिटातून पाच्चा ठोकळा काढला.
तसा त्यानं हिसका दिला अन् ठोकळा घिउन पळत सुटला.
माय खड़बडून उठली अन जोरात पावलं टाकत त्याच्या मागणं निघाली.
तेव पळत म्हताऱ्यापशी आला अन त्याच्या परातीत पाच्चा ठोकळा टाकुन तसाच उभा ऱ्हायला, पुढणं आलेल्या मायच्या डोळयाकडं बघत.

परातीत झालेलं 'ठण्ण' ऐकून आंधळा म्हतारा खुलला पर 'तेव' स्वास रोखुन तिथच् थांबला.
रागत आलेल्या मायची डोळं डबडबलं.
तिनं आपल्या चिमुकल्याला उचललं अन त्याचं डोस्कं हातात धरुन मटकन मुका घेतला.

# चमत्कारी बाबा (कथा)

प्रेषक, आनंद कांबीकर, Sat, 12/12/2015 - 00:59

रात्रि पोहचायला उशीर झाला म्हणुन सकाळी थोड़े जास्त झोपावे म्हटले तर मिल्याची काहीतरी शोधा शोध सुरु झाली. त्याने टीव्ही चा टेबल खर्रकण सरकावाला आणि मी उठुन बसलो.
"काय शोधतोय रे, मिल्या?"
"काय नाय, तु झोप"
त्याची सरका सरकी चालूच.
मी भिंतीला टेकुन त्याच्याकड़े पाहत बसलो.
कॉट खाली, टेबलाखाली, टीव्ही मागे, बॅग मधे पाहुन झाल्यावर त्याला काहीतरी आठवल्या सारखे झाले. त्यानं रॅक मधल्या पुस्तकांच्या सांदित हात घातला आणि एक वाळलेले लिम्बु बाहेर काढले. ते दोन वेळा कपाळाला लाऊन उजव्या खिशात ठेवले.
"हे शोधित होतो. इथल्या दर्ग्यावरच्या बाबांनी भारुण दिलय्" माझी झोपमोड़ केल्याचा खेद त्याच्या आवाजात जानवला.
मी काहीच बोललो नाही. त्याने एकदा माझ्याकडे पाहिले आणि ड्रावर मधली लाल कापडाचे कवर घातलेली वही दाखवत पुनः बोलु लागला;
"जेव्हापासून हे लिम्बु खिशात ठेवायला लागलो ना तेव्हा पासून पेशंटची रांग लागतेय. ही वही बघ. आज सहा महीने होत आलेत बाबाला भेटुन त्या तारखेपासुन बघ अकड़ा वाढतच गेलाय. बाबा दर शनिवारी नविन लिम्बु देतात अन एखादी पूजा सांगतात. तेवढी मनापासुन केली की गल्ला डबलच्"
त्याने वहिच हातात दिली. चांगली जाड्जुड़ वही गोळया, इंजेक्शन्, सलायनी यांच्या हिशोबानी भरत आलेली. मी उगाच पानं चाळत बसलो. बुट पायात घालुन झाल्यावर तोच म्हणाला;
"आन इकडं, आज उशीर झालाय. अंघोळ करुण ओपिडीत ये मग बोलु"
तो गेल्यावर माझी नजर छताकडे गेली. दोन कुंकवात न्हाहलेले नारळं वरती बांधलेले. मागच्या रुममधे खिड़कीला एक भली मोठी काळी भावली बांधलेली. किचन वट्यावर एक लाल कपड़ा अंथरलेला आणि त्यावर सुया खुपसलेले लिंबं टाकलेली. त्याला लावलेले

हळदकुंकु डोळयात बसले. बाथरूमच्या खिड़कित कुंकवात रीडबीड झालेली दोन कश्याचितरि अंडी, बाजुला दोन चार काळया मिराच्या. मला भिती वाटायला लागली. मिल्या कसल्या पुजा करतो काही उमगेना. खोलीत कुठल्या देवाचा फोटो किंवा मूर्ति असे काहीच नव्हते. मी कसेबसे आवरले आणि दवाखान्यात येऊन बसलो. मिल्या पेशंटला सलायन लावुन माझ्या जवळ येवुन बसला.
"उद्या कितिवाजता हे इंटरव्हिव?" मिल्या.
"पत्रात दुपारी दिडचा टायमिंग दिलाय" मी.
" चल मंग सकाळी दर्ग्यावर जाऊन येवु"
गेल्या चार महिन्यात पाच सहा इंटरव्हिव दिलेले पण एकातही यश मिळाले नाही, हे मिल्याला माहित होते. म्हणुनच तो सरळ "जाऊ यया का?" न म्हणता "जाऊ" म्हणाला. त्याला नाही म्हणणे शक्य नव्हते. एकतर एवढ्या मोठ्या शहरात प्रथमच आलेलो, रहायची व्यवस्था त्याच्या रुमवर आणि त्यानं माझ्यासाठीच
उद्या काहिवेळ दवाखाना बंद ठेवण्याचा निर्णय घेतलेला.
नंतर पूर्ण दिवसभर त्यानं मला त्या दर्ग्यावाल्या बाबाचे चमत्कारी किस्से सांगितले. माझी पण बाबाविषयीची उत्सुकता वाढली.
सकाळी लवकर उठुन त्यानं पाच लिम्बु विकत आणली.
गाड़ीवरनं आम्ही दर्ग्याला पोहोचलो तेव्हा सकाळचे सात वाजलेले.
एक भलं मोठं चिंचेचे झाड़, त्याच्याखाली बसलेले ते बाबा. आपले कष्ट बाबांना सांगुण त्यावरचा उपाय जाणुन घेण्यासाठी लोकांची मोठ्ठी लाईन लागलेली. आम्ही नंबरला लागलो. गर्दी पाहुन मला इंटरव्हिव बुडण्याची भीति वाटु लागली. एवढ्या दुर हुन इंटरव्हिवला आलो आणि तिथेच पोहचायला उशीर झाला तर? मी त्याला चल म्हणालो पण तो तयार होइना.
आमचा नंबर आला तेव्हा अकरा वाजलेले.
"बाबा, दवाखाना चालु केला तेव्हा पार वाट लागलेली पर तुम्ही भेटले आणि सगळं कसं व्यवस्थित जुळून आलं" मिल्या.
"बोला डॉक्टरसाहेब, आज काय काम काढलत?" बाबांचा घोगरा आवाज.
"बाबा, हा माझा मित्र. गावाकडुन आलाय. आज त्याचा इंटरव्हिव आहे. मागच्या काही महिन्यापासून त्याला नोकरिच लागत नाही.."
मिल्याला मधेच थांबवत बाबा बाजुच्या अगरबत्त्यांची राख कागदात बांधून, ती पुड़ी माझ्या हातात देत म्हणाले;
"या पुड़ितला अर्धा अंगारा तिथे गेल्यानंतर तुझ्या कागदपत्रात टाक आणि उरलेला पाण्यासोबत पिउन टाक. लक्षात ठेव तुझ्यात खुप दोष आहेत अंगारा पेल्यावरच यश मिळेल"
ती पुड़ी खिशात ठेऊन आम्ही निघालो. एक वाजता इंटरव्हिव च्या ठिकाणी मला सोडुन मिल्या दवाखान्यात निघुन गेला.
तिथे पोहचल्यावर नोंदणी केली आणि वेटिंग रूममधे बसलो. खोली गच्च भरलेली. धड़धड़

वाढली. सगळे उमेदवार एकचढ़ एक. मिल्याचे अर्धा एक तासात चार कॉल येऊन गेले. त्याचा कॉल रिसिव्ह करने शक्य नव्हते.
इंटरव्हिव अर्धा तास चालला. बाहेर आल्यानंतर मिल्याला खुशखबर द्यावी म्हणुन बॅगमधुन फोन काढला तर त्याचेच तब्बल अकरा मिसकॉल.
"हेलो मिल्या, काम झाले. त्यांनी डायरेक्ट उद्याच् जॉइन करायला सांगितले"
".. एक नंबर! बघ बाबाचा चमत्कार कसा हे" मिल्याने अक्षरशः किंचाळतच फोन कट केला.
दवाखान्यात गेलो तेव्हा मिल्याने चहा सांगितला.
"बघ! तुला बी अला की नाही बाबाचा अनुभव. तुला येवढुसा अंगारा प्यायला दिला अन तुझ्यातले सगळे दोष धुन काढले. उगाच येवढी गर्दी नसते दर्ग्यावर" बाबाने मिल्याला पुरता ग्रासुन टाकले होते.
मी हळुच माझ्या शर्टच्या खिशातुन बाबांनी दिलेली पुड़ी काढली आणि त्याच्या समोर ठेवली. त्याला चांगलाच धक्का बसला. तो आ वासुन माझ्याकडे पाहु लागला.
बराचवेळ दोघेही शांत होतो.
"तु हा अंगारा पिला का नाहीस?" मिल्या अवसान गळाल्या गत बोलला.
मी त्याच्या समोरची पुडी हातात घेतली.
"हे बघ मिल्या, माणसाचे मन खुप हरामखोर असते. मी आज जर का हि राख पिलो असतोना..? माझा माझ्या या मनगटावरचा विश्वास कायमचा उडुन, मुठितल्या या पुडिवर बसला असता"

# तांत्रिक अंधश्रद्धा

प्रेषक, आनंद कांबीकर, Thu, 10/12/2015 - 23:12

"काय दिनु भाऊ, काल पोरगी पहायला गेलता म्हणे. केली का मग पास?" डोंबिवलित चढल्या चढल्याचढल्या मी त्याला विचारले.
"हो गेलतो की. आणि पास पण करुण आलो" तो गर्दीतुन मान वर काढत बोलला.

"मग ज़रा फोटु बिटू दाखवाकि आम्हाला?" मागच्याला पुढं घालत रम्या आमच्याकडे वळाला.
दिन्याने एकदा खिशातून मोबाइल काढला, लॉक उघडायचे बटन दाबले आणि बाजूला उभा लोकांकडे पाहत परत खिशात ठेऊन दिला. बस मग काय,त्याला फोटो दाखवायचा नाही हे रम्याच्या लक्षात आले.
"मुलीला केसं आहेत कारे? का आपल्या बॉससारखी हे?" म्हणत रम्या मोठ्याने खिदळु लागला.
"ये रम्या, फोटुवर लाइन मारायची नई बरका. आपली वैनी हे" मी पण खेचायला सुरुवात केली. ठाण्यातून सुन्या आणि बाब्या बसले. त्यांनी पण दिन्याची जाम खेचली. येरव्ही दिन्या आमच्यात सामील व्हायचा पण आज त्याचे वागणे थोड़े खटकले म्हणुन सर्वांनाच चांगला चेव आलेला. दादरला उतरल्यावर स्टेशनच्या बाहेर येई पर्यंत दिन्या मागे पडलेला. आमची त्याच्या सोबत चलायची पण इच्छा नव्हती. बाहेर कंपनीची बस उभाच होती. आम्ही चटकन शिरुण पुढचे सीट पकडले. तो मागे जाऊन बसला.
ऑफिसमधे सर्वजन आपल्या आपल्या कामला लागली. मी पीसी स्टार्ट करुण दिन्याकडे एक तिरपी नजर टाकली. तो त्याच्या टेबल जवळ उभा होता. हातातल्या मोबाइलला त्यानं ओषधाच्या बाटली सारखं हालवले आणि टेबलवर ठेऊन दिले.
लंचब्रेक मधे आम्ही सर्वांनी एकमेकांना आवाज दिले आणि कैंटीनकड़े निघुन गेलो. दिन्याला कुणीच् बोलावले नाही.
आम्ही टेबलवर टिफिन खोलले तेवढ्यात दिन्या आला. खिशातून मोबाइल काढुन त्यानं, उडवायच्या आधी शाम्पेनची बाटली जाशी हालवतात तसा मोबाइल हालवाला. आम्ही एकसाथ त्याच्यावर नजर ठेऊन बसलो. त्यानं मोबाईल आमच्याकडे दिला आणि
"ही बघा तुमची वैनी" म्हणाला.
"माकडा, मग अगोदर दाखवायला काय झालते?" मी न राहवुन त्याला विचारले.
"आरे! या मोबाइलचा प्रोब्लेम झालाय. खिशात ठेवला कि बंद पडतो. ओनऑफचे बटन कितीही वेळा दाबले तरी चालु होत नाही अन तीनवेळा जोरात हलवले की लगेच चालु होतो"
सगळे जोरजोरात हसले.
"साल्या, दुरुस्त करुण घे की मग!" बाब्या.
"चांगला हप्ताभर ठेवला होता. शेवटी कंटाळून वापस आणला" दिन्या.
"कल्याणला चल आज. आपला एक दोस्त हे. तो कसलेपण मोबाईल दुरुस्त करतो" मी.
"मी भरपुर दुकानात दाखवलाय. काही उपयोग नाही" दिन्या.
"अबे तु चाल त् खरं. आपला अहमदभाई जाम एक्सपर्ट हे" मी.
"मला काम हे आज. एक काम कर आजचा दिवस तुझा फोन मला दे अन माझा तु घेऊन जा" दिन्या.
ऑफिस सुटल्यावर माझा कीपॅडवाला मी त्याला दिला आणि त्याच्या स्क्रीनटच मधे माझे कार्ड टाकले. संध्याकाळी अहमदभाईला मोबाईल दाखवला. त्यानं अर्धा तासात दुरुस्त

करुण दिला. नंतर आम्ही नऊ च्या शो ला गेलो. मधे मी बराचवेळा फोन खिशातुन काढुन चेक केला, ओके होता.
शो सुटल्यावर रूमकडे आलो. घरमालकाने मेन गेट ला कुलुप लावालेले. पार्टनरला फोन करुण चावी फेकायला सांगवी म्हणुन खिशातुन फोन काढला तर तो बंद पडलेला.
मग उजव्या हातात फोन घट्ट धरला आणि जोरात तिनवेळा वरखाली केला.
..... आणि गालातल्या गालात हसतच पार्टनरला फोन लावला.

# म्हण

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 06/12/2015 - 01:18

मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर साहेबांचा पुढचा पुर्ण आठवडा धावपळीतच गेलेला. कसली कसली उदघाटनं, सत्कार समारंभ, मिरवणुका. नुसती पळापळ. आता आख्ख पोलिस खातं त्यांच्या हातात आलेलं म्हटल्यावर या गोष्टी कायम असनारच. पण पुढच्या पाच वर्षाची गणितं मांडुन त्यांना ते खातं त्यांच्याच पध्दतीनं चालवायचं होतं. मागच्या मंत्री साहेबांनी पाडलेले वळणं बुजवुन त्यांना ती नव्यानं टाकायची होती. त्यासाठी संध्याकाळी त्यांनी पत्रकार परिषद आयोजीत केलेली. राज्यातल्या सर्व प्रमुख वृत्तपत्र तसेच वृत्तवाहिन्यांचे पत्रकार साहेबांच्या बंगल्यावर जमा झाले.
साहेब पत्रकारांसमोर बोलायला उभे राहिले तेव्हा त्यांना शाळेतले मसलेकर गुरूजी आठवले. चौथीत असताना एकदा गुरूजी म्हणी शिकवत होते. सात आठ म्हणी शिकवुन झाल्यावर इयत्ता चौथीत शिकनारे चुनचुनित साहेब उभा राहिले.
"म्हण मजी काय ओ गुरूजी?" साहेब.
"म्हण म्हणजे शब्दसमुह. वर वर पाहता ते फ़क्त शब्दच असतात पण मागे एक अर्थ दडलेला असतो आणि तो अर्थ फ़क्त जानकारांनाच समजतो. म्हणुन शहाणी मानसं कमी बोलतात आणि बोलताना नेहमी म्हणींचा उपयोग करतात" गुरूजी सांगत होते आणि साहेब शांतपणे ऐकत होते. गुरूजी पुढे म्हणाले:
"थोडक्यात सांगायचे झाले तर, म्हणीचे दाखवायचे वेगळे आणि खायचे दात वेगळे असतात. "
चुनचुनित साहेब तेवढीच शाळा शिकले पण तो तास त्यांच्या कायम धेनात राहिला. इयत्ता चौथीपासून ते इथपर्यंत ते 'म्हणी'प्रमानेच वागले. आजही त्यांनी "लकड़ी शिवाय मकड़ी वठनिवर येत नाही. पोलिस खाते हाताशी धरून पुढच्या सहा महिन्यात मी राज्यातील सर्व अवैध धंदे बंद करणार आहे" एवढेच बोलुन परिषद संपवली.
पण परिणाम बरोबर साधला. साहेबांचे शब्द सर्व वृत्तपत्रांच्या आणि वाहिन्यांच्या टेबलावर जाऊन आदळले. तिथून थेट वेशितल्या वडाखाली, मारुतिच्या पारावार, टपरिवर, बसस्टेंडवरच्या हाटेलित नुसते घुमत राहिले. सगळयांची हवा टाईट झाली.

मटका अड्डे ओस पडले, मावा विक्री थांबली, पत्ता क्लब बंद पडले, हातभट्टीची भट्टी विजली, वाळुचे ट्रक गुडुप झाले. पोलिस हप्ते घेइनात तेव्हा त्यांच्या पगारी वाढल्या असा समज करुण घेत ज्यांनी धंदे चालु ठेवले त्यांच्यावर धाडी पडल्या, लाठ्या पडल्या, जेलची वारी घडली. जिकडे तिकडे पोलिसांच्या गाड्या फिरू लागल्या. महिनाभरात सगळया अवैधवाल्यांचे धाबे दनानाले. पोलिसांची त्यांच्यावर चांगलीच दहशत बसली.
भाऊ म्हणजे झामनीचे प्रसिध्द व्यक्तिमत्व. पन्नाशीतले पण गड़ी एकदम पैलवान, त्यांचा अवैध वाळु विक्रीचा धंदा. भाऊंचा मागचा पुर्ण महीना धवपळीतच गेलेला. एकुलत्या एक लेकीचे लग्न. भाऊंनी पस्तिस लाख आणि दहा तोळे सोन्यात चांगला सोन्यासारखा जावई मिळावला होता. शांत डोक्याने त्यांनी आपले दोन्ही ट्रक मळयात उभा केलेले. त्यांना कसल्याच प्रकारचे विघ्न नको होते. पोरगी येतीजातिला येऊन गेली आणि मग त्यांनी आपला मोर्चा धंद्याकडे वळवला. सुरुवातीला त्यांनी पंचक्रोशितल्या सर्वच दोन नंबर धंद्यावाल्यांना घरी बोलावाले आणि मगच आपली स्कॉर्पीओ गावाबाहेर काढली. त्यांनी सोबत फ़क्त काच्चुन भरलेल्या दोन थैल्या आणि चौथीपर्यंतच्या शिक्षणाची शिदोरी घेतली. चौथीतल्या म्हणन्या ऐवजी फ़क्त मसलेकर गुरुजींच्या त्या एका तासाची म्हणणे योग्य होईल. त्या तासाला मसलेकर गुरूजी म्हणी शिकवत होते तेव्हां कुठल्यातरी एका शेकड्या पोराने गुरुजींना 'म्हण' चा अर्थ विचारला. गुरुजींनी म्हण म्हणजे 'खायचे वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे' असे सांगितले. वरतुन शहानी माणसे 'म्हणी' सारखेच बोलतात, आपल्याला ते ओळखता यायला हवे असेही सांगितले. याचाच विचार करत भाऊ बंगल्यावर पोहचले, तेव्हां मंत्री साहेब पुजा करत होते. भाऊंनी थेट देवघरातच थैली नेउन मांडली. साहेबांचा खुललेला चेहरा पाहुन भाऊ म्हणाले:
"देवा, आमच्यावर कृपा असु दया! प्रसादाचि काळजी करु नका! तो वेळेवर चढवाला जाईल!"
त्यावर, मोठ्याने हसत मंत्रीसाहेब म्हणाले:
"देव बदलला आहे. पहिल्यापेक्षा जास्तच कृपा होईल पर असा थोडा थोडा प्रसाद आणुन देवाला नाराज करु नका"
भाऊ हसले, स्कोर्पीओ कड़े गेले आणि काच्चुन भरलेली दुसरी थैली साहेबांसमोर आणुन मांडली. साहेब खुश होऊन "तथास्तु" म्हणाले. भाऊ स्कोर्पीओ घेऊन गावांत आले.
काळीभंगार रात्र आणि तिला भगदाड पाडत निघालेली, वाळुने खच्चुन भरलेली भाऊंची ट्रक. झामनीच्या शिवारात दूसरे कुठलेच वाहन नव्हते.
"भौ नी लए फसकास काम केलं बॉस! सालं म्हैनाभर खायचे वांधे झालते!" ट्रक चा क्लीनर ड्रायवरला म्हणाला.
"अरं! हे तं कैच नै! भौ नी कालच् दोन वाळु काढाच्या बोटी बुक केल्यात. आपली तं चांदीच् है आता!" म्हणत ड्रायवरने ट्रकचे लाइटं अप्पर डिप्पर केले आणि समोरून येणाऱ्या मोटारसायकलला रोडच्या खाली घालत ट्रक तुफान पळवला.

# दिवाळी कुणाची?

प्रेषक, आनंद कांबीकर, Mon, 23/11/2015 - 23:20

"ये आये, दिवाळी कधीच्याला हाय गं!"
"हाय उंद्याच्याला"
"आये, मंग तू दाळीचे लाडु कव्हा करणार हैस"
"करतीना उंद्याच्याला"
"आये, त्वा रोजच् उंदया उंदया म्हंतीस"
"मंग जाय रासन आलं का नय ते यी बघुन. रासनात दाळ येणार हाय "

---

रातपासुन पांधीत दबा धरून बसलेले दोन ट्रक नानासाहेबाच्या मळयाकड़े निघाले. त्यातला एक ट्रक अजुन तसाच होता, अगदी सीलबंद. दुसऱ्या ट्रक मधली अर्धी निम्मी पोती पांदितच काढुन ट्रॅक्टरणे गावांत पाठवली.
ट्रॅक्टर राषन दुकानसमोर येताच, राषन आल्याची बातमी वाऱ्यासारखी गावभर पसरली. थांबलेल्या दिवाळीत उत्साह संचारला.
नानासाहेबला ट्रक मळयात सोडुन येउस्तवर दुकानासमोर भली मोठी रांग लागली.
"च्याला आपल्या लोकाइला दमच पडत नै. फुकट म्हणलं की लगीच वर थुत्तर करुण निघत्यात" शिव्या हासडतच सरकारी स्वस्तधान्य दुकाण मालक श्री नानासाहेब यांनी धान्य वाटप चालु केली.
"मालक, इस किलु घऊ, दोन क़िलु साकर अन पाच क़िलु हरबऱ्याची दाळ द्या"
"राम्या, अरं अख्ख्या गावाची दिवाळी तु एकटाच खातु का?"
"मालक, पोरी सोरी आल्यात सनाला"
"देशात सगळीकडं दुस्काळ चाल्लाय. याबरचीना बी माल उलशिकच आलाय. धा किलु घौ, एक किलु साकर अन एक किलु दाळ घी. अन भाव बी वाढलेत अता, चल! उरक!"
नानासाहेबांनी कुपनावर ठसा मारून गड्याला धान्य मोजायला सांगितलं.
तिसरापहार पर्यंत धान्यवाटप चालु होतं.
मधेच एकदा नानासाहेबांना फोन आला
"मालक, सरकारी पोत्यातला माल काढून आपल्या पोत्यात भरला" फोनवर नानासाहेबांचा ख़ास माणूस बोलला.
"बरायं! ती सरकारी पोतडी जाळुन टाका मागल्या बारचिवनी इकु नगा लोकाइला" नाना.
"बरं! मालक. लगीच चेतून देतु!"
"निकमाचे टेम्पु धाडून देतु, लग्गीच् माल मार्केट मंदी जाउद्या. माराड़याला सांगुण ठुलय" नाना.
"बरं मालक"

---

"ये आये! बारीक बारीक गोटी येवढुले लाडु कामुन केले ग? अन लै मोठे बी नै केले"
"खा गप गुमाणं, लए रडरड नगस करू. रासनात उलशिकच दाळ आलती" माय त्याच्यावर खेकसलि.
"हेव बघ! माह्याजवळ केवढा पेढा हाय! लाडुन मोठा!" अवखळपने चड्डीच्या खिशातुन एक पेढ़ा बाहेर काढत तो मायेला म्हणाला.
"त्वा कुठुन रं आनलास?"
"त्या रासनवाल्या नानाभाऊ नं दिवाळीला नवी जीपकार घेतली ना त्याचा पेढा वाटला त्यायनि भाईर"

# योजना

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 22/11/2015 - 11:17

(पात्रांची मानसिकता खरी असली तरी दुर्दैवाने योजना काल्पनिक आहे)
मंत्रीन् बाईंनी फर्मान काढलं तशी कागदं वरुण खाली अन खालुन वरती फिरली. योजनेची ताबडतोब अंमलबजावणी झाली. खेड़ोपाड़ी शिक्षण सेविका पदर खोचुन उभा ठाकल्या. पाट्या, पुस्तकं पोहचली. भत्ते सुरु झाले. शाळात लाइटं लागली. दिवसभर राणात् राबनारी हातं रातच्याला लेखान्या धरु लागली. वर्गा वर्गातून बांगड्याची सळसळ वाढू लागली. पण जेव्हा गणना झाली, टक्केवारी हाती आली तेव्हा बाई हदरल्याच. पाण्यासारखा पैसा ओतून, मोठी फौज उभारुण फ़क्त दहा टक्केच बाया शाळात येतात, हे ऐकून बाईंच्या डोक्यात आग आग झाली. शंभर टक्के स्त्रियांना साक्षर करण्याच्या हेतुने चालु केलेली ही योजना बरगळन्याची चिन्ह दिसू लागले.
बाईंनी वेग वेगळया केंद्रांना भेटी द्यायला सुरुवात केली.
बाई जि.प. शाळा, मंडनगाव येथे आल्या तेव्हा रात्र झालेली. शाळेला भेट दिली तर वर्गात पाचच बाया. विचारपुस केली तेव्हां लक्षात आले की गावांत अडानी स्त्रियांचे प्रमाण सत्तर ते अंशी टक्के आहे. मग स्त्रियांशी स्वतः बोलून त्यांची समजूत काढायच्या दृष्टीने बाई मंडनगावतच मुकामाला थांबल्या.

बया शेतात कामाला जातात म्हणून बाई सकाळीच तयार झाल्या अन एका एका घरात शिरू लागल्या.
"तुमचे नाव काय?" बाईंनि एकिला विचारले.
"रंजना बुडगुले"
"रात्रीच्या शाळेला जाता?"
"हो"
तिचे 'हो' ऐकून बाईंना बरे वाटले.
"मग तुम्हाला या चार महिन्याच्या शाळेतून काय काय फायदा झाला?"
"मला वाचाया येऊ लागलं, हिशुब जमु लागला, म्या अता एस टी ची पाटी बी वाचत्या"
तिचे उत्तर ऐकून बाई सुखावल्या.
"तू जातेस का ग?" शेजारच्या घरात तान्ह्या पोराला पाजत बसलेल्या एकिला बाईंनि विचारले.
"नई" पदराने तोंड झाकत ति बोलली.
एका स्त्रिला लाजनाऱ्या स्त्रिकडे पाहुन बाईंना कुतूहल वाटले. बाई तिच्याजवळच जमिनीवर बसल्या.
तिच्या बाळाला हातात घेऊन त्याचे पापे घेतले. ति अनखिनच लाजलि.
"शेजारचि रंजना बघ. शाळेत जाउन तिला किती फायदा झाला. तुम्ही दोघी शेजरिच राहता. मग तु का बरं शाळेत जात नाहीस"
"अमच्या ह्यानला नई आवडत बयांनी लिखा पढी केल्यालं" पदराअडुन उलशिक तोंड दाखवत ति बोलली.
बाई तड़कन उठल्या अन सरळ स्वतःच्या कार्यालयात आल्या.
आल्या आल्या त्यांनी शंभर टक्के पुरुष साक्षरतेच्या योजनेच्या अंमलबजावनीचे फरमान काढले.

# साळा भायरची साळा

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 15/11/2015 - 20:28

पाटलीन बाई आंत होत्या. बाहेर वट्यावर केराचं टोपलं मांडलेलं. त्याच्यात एक रंगीत, जुनाट, पानं उडालेलं पुस्तक पडलेलं. दाराची कडी वाजवून धोंडू तिथेच पुस्तक चाळत बसला.
वरचे चित्र पाहुन खाली दिलेल्या अक्षरांची जुळवा जुळव करण्यात त्याचा बराच वेळ गेला.
एका पानावरच्या बिल्डिंगीच्या चित्राखालचा 'ईमारत' हा शब्द त्याने जुळवत आणला तेवढ्यात दार उघडलं गेलं.
"काय रे धोंड्या?" आणखी केर टोपल्यात टाकत पाटलीन बाईंन् विचारलं.
" मायणं भगुलं दिलतं, रातच्याला आमी तोडिला निगन्हार हओ मनुन" धोंडू ते पुस्तक वापस केराच्या टोपल्यात खुपसत उभा राहिला आणि पातेलं बाईंच्या हातात दिलं.
" चालले कारे? मला वाटलं हैत अजुन चार दोन दिस"
"नै ना रातच्यालाच निघाचं, टरक यिवुन हुबा ऱ्हाहिलाय बजारात"
"बरायं, मायला दे धाडून थोडा येळ, उलशिक बाजरी पाण्यातून काढायची म्हणाव"
"बराय!" म्हणत धोंडू केराचं टोपलं उचलु लागला.
"आरं! ऱ्हाउदी नई उचलनार तोह्याचीनी, म्या टाकते निहुन्" पाटलिन बाई हातातले पातेले वट्यावर ठेवत पुढे आल्या.
"म्या उचलितु बराबर तुमि उलसिक हातलावा खालुन" टोपल्याला गूढग्याचा आधार देत त्यानं टोपलं बरेच वर उचलले.
"धोंड्या लय जड़ हाये, खळयापोत नै झेपायचं तुला" म्हणत पाटलीन बाईंनी टोपलं त्याच्या डोक्यावर ठेवलं.
"म्या अत्ता नेउन टाकतो" म्हणत धोंडू स्वतःला व् टोपल्याला सावरत खळयातल्या उकिरड्याकड़े निघाला.
टोपलं उकिरड्यावर पालथं करुण त्यातलं पुस्तक झटकत धोंडू पळतच घरी आला. पुस्तक छपरात खोसलं आणि परत मोकळं टोपलं घेऊन पाटलाच्या वाड्यावर गेला.

# तंगडीची गोष्ट

प्रेषक, आनंद कांबीकर, Wed, 11/11/2015 - 00:32

बापानं खोली करुण दिली, मेस लाउन दिली, "आता थेट दिवाळीलाच गावांत याचं! कई कुटाने केले अनआदि मदी गांवात दिसला त् तंगडच् तोडील" म्हणत एका किकमधे बुलेट

चालु केली आणि निघुन गेला.
खोली ऐस-पैस पण मी एकटाच. मागच्या वर्षी रूम पार्टनर लोकांनी लफडा केला आणि पळून गेले. मार मी खाल्ला, घरमालकचा आणि नंतर बापाचा. आमचं शिक्षणच ठप्प होण्यासारखं मॅट्टर होतं पण बापाला शिक्षणाची भारी हौस म्हणून त्यांनीच साऱ्यावर पांघरुण घालून दुसऱ्या कॉलेजमधे एडमिशन करुण दिली.
मी पण ठरवले यावर्षी खुप अभ्यास करायचा, फालतू उद्योग एकदम बंद.
सकाळी उठून थोडा व्यायाम केला, अंघोळ उरकुन थोडं वाचन केले आणि मग कॉलेजला गेलो.
गेटवरच जिरेवाडीचा सुभ्या भेटला. त्याने कडकडून मीठी मारली, मी ही खुश झालो. पहिलांच तास भौतिकचा होता. सुभ्या आणि मी मागच्या बेंचवर थॉमस अल्वा एडिसन चे नियम समजून घेत बसलेलो. तेवढ्यात एक मुलगी दरवाज्यात आली. सर तिला यां यां म्हणाले. ति वर्गात घुसली. तिच्या मागे दोन मूली. तिना काळया जिन्सवर मेहंदी रंगाचा टॉप घातलेला. भरपूर ऊंची आणि साजेसा बांधा. कमरेपर्यंत येणाऱ्या केसांची चोपुन वेणी घातलेली. वर्गात शिरल्यावर तिना लाजुन एक सार्वजनिक स्माईल दिली. मी एकटक तिच्याकडेच पाहत राहिलो. मेहंदी टॉपवर तिचा गहुवर्ण खुलला होता. टपोरे डोळे, गालावर पडलेली खळी आणि मोठ्ठी चॉकलेटी टिकली मी निरखु लागलो. ति मागच्या बेंचवर येऊन बसली. वहिवर पेन फिरवत तिरप्या नजरेने मी तिला पाहू लागलो. तास लवकर गेला. हजेरी चालू झाली तेव्हां भानावर आलो. सर खाली पाहुन नावे वाचु लागले. तिचं नांव ऐकायला कान आतुर झाले. सरांनी मुलीचे नांव वाचले कि मी तिच्याकडे पहायचो.
'चंद्रकला?' सरांनी नांव वाचले.
'येस सर' ति म्हणाली.
येस चन्द्रकला. एकदम छान नांव. मोहक नांव. आवडले. आपल्या आईचे नांव शशिकला, काकुचे रत्नमाला आणि अता ही चंद्रकला. हे नांव आपल्या घरात अगदी शोभून दिसणार. सर निघाले तेव्हा ध्यानात आले "स.... सर माही हजेरी"
"नांवघेतले तेव्हां झोपला होतास का रे गाढवा?" म्हणत सरांनी हजेरी लावली.
सुभ्याच्या लक्षात आलं. तो म्हणाला, तुमचा जोड़ा लए भारी दिसणार. मी म्हणालो तसलं कायनाय असाच बघत हुतो, आता रसायनाच्या तासाला सरांकडे चांगलं लक्ष देऊ भौतिकचा तास फुकट गेला. तो शांत झाला. तरिपण तो खोलीवर आला कि तिच्याच गप्पा काढायचा. ति माझ्या मनात बसलेली पण मी सुभ्याला सांगणे टाळले. उगाच गांवभर चर्चा कशाला?
खोलीवर एकटा असलो कि तिचेच विचार डोक्यात यायचे. मग मी पाकिटातून बापाचा फोटो काढायचो आणि त्याच्याकडे पाहत अभ्यासाला बसायचो.
एकदा वर्गात, मानगे सरांनी तिला प्रश्न विचारला. ति येत नाही म्हणाली. सरांनी तिला खुप झापले. मुर्ख, ढ वगैरे म्हणाले. थोड़ावेळाने तिने सरांना 'जिरोटी' या शब्दाचा चा अर्थ विचारला. सरांना माहित नव्हता त्यांनी स्पेलिंग लिहून घेतलं आणि उद्या सांगतो

म्हाणाले. नंतर कोलतेसरचा तास सुरु झाला. मानगेसर 'जिरोटी' च्या शोधात बाहेर पडले. ते नुकतेच जॉइन झालेले, आणि भरपूर उत्साही. आख्या कॉलेजमधे हुशार म्हणून प्रसिद्ध. आपल्याला उत्तर येऊ नये, हि गोष्ट त्यांना बोचली. ते बराच वेळ गूगल ला झटलें नंतर ग्रंथालयात जाउन त्यांनी जुनि पुस्तकं चाळली, एक दोन मित्रांना फोन केले पण 'जिरोटी' चा अर्थ सापडला नाही. सरांनी दुपाराचे जेवणपण केले नाही. शेवटचा ओझरकर बाईंचा तास चालु होता तेव्हां ते वर्गावर आले.
"कुठल्या पुस्तकात वाचलास तू हां शब्द?" त्यांनी चंद्रकलेला विचारले.
"नई सर, पुस्तकात नई वाचला" ति हसत हसत म्हणाली.
"मग कुठे वाचलास? दाखव पूर्ण वाक्य काय आहे ते?" सर खुपच परेशान दिसत होते.
"नई सर.. ते...तेव शब्द म्या महि अवड़ती अक्षरं जोडून तयार केला हुता" तिना लाजत लाजत सांगून टाकले.
सगळा वर्ग खी खी करुण हसु लागला. मानगेसरांचे टाळके सराकले. ते "तुझ्या...." म्हणत पुढे आले पण ओझरकरबाईंना पाहून भानावर येत चरफटत निघुन गेले. ति बराच वेळ हसत होती आणि मी पण.
सुभ्या बोलला सांभाळून लाइन टाक पोरगी लय डेंजर दिसतेय. मी बोललो तसं काय नाय रे सुभ्या! पण मला बारीक हसु फुटलं. त्यानं पाठित गुद्दा हानला व् जोरात हसून मला डिवचु लागला. सारं प्रकरण सुभ्याच्या ध्यानात आलं. त्याला कुणीच् खोलीवर ठेवत नव्हतं तिच्या गप्पा काढत तो माझ्याच खोलीवर राहु लागला. बुलट वाजली तर बाथरूम मधे लपायला हि तो तयार झाला. घरमालकाला माहित व्हायला नको म्हणून त्याला मी लपत लपत ये जा करायला सांगितले. सुभ्या असल्यावर माझा वेळ मस्त जाऊ लागला. खोलीवर असला कि तो सारख्या बिड्या पेटवायचा आणि चंद्रकलेच्या गप्पा मारायचा. मग मी रोज थोडा थोडा आणि परिक्षेच्या वेळी जास्त अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. सुभ्या एका अठवडयातच सगळया वर्गात फेमस झालेला. पोरं त्याला हात वर करुण सलाम करायचे तर पोरी नाक मुरडून जायच्या. तो गॉगल लाऊन त्यांच्या गल्लीला जायचा त्याला वाटायचे एकतरी पोरगी लाइन देइल. मी कधिच त्याच्यासोबत गेलो नाही कारन आमची बुलट केव्हा कुठून निघल याचा भरवसा नसतो.
वर्गात मागे बसनारांमधे मी आज एकटाच होतो. साडे नऊ च्या सुमारास सुभ्या आणि आणखी चार पाच जन वर्गात घुसले.
"एवढ्या उशिरा का आले रे?" जोशीसरांनी विचारले.
"सर गावातून बस ला निघायला....." सुभ्या काहीतरी ठोकनार तेवढ्यात त्याचे वाक्य मधेच तोडत चंद्रकला म्हणाली "सर ही पोरं खाली टपरिवर बिड्या फुकत बसतात मनुन उशीरा येतात अन ही पोरं काल बी वर्गात नव्हती, नऊ ते बारा पिच्चरला गेलती"
सरांनी स्वतः एक एक झापड़ी हानल्या आणि त्यांना प्रिंसिपल सरांकडे घेऊन गेले. ते गेल्यावर चंद्रकला आणि मूली एकमेकिंना टाळी देत मोठ्याने हसु लागल्या. संध्याकाळी खोलीवर आल्यावर सुभ्याने सांगितले, "यार, त्यादिशी तुह्या चंद्रिबरं माहि बी आटम बाजारात फिरत हुती म्या अन हानम्यानं लय पिच्छा केला अन शिट्टया बी मारल्या,

त्यहिला परेशान केलं त्याचा तीनं आज बदला घितला. पर तू भीउ नगस बीनधास् लाईन टाक. बाजारात पोरिह चे लफड़े ध्यानात येतात तुह्या चंद्रिच् कई परकरण दिसत नई"
चंद्रकला पोरांच्या चांगलीच डोक्यात बसली. वर्गात बसल्या बसल्या तिला शिव्या देणं हा त्यांचा छंदच् झाला. ते नेहमी बदला घ्यायच्या विचारात असत पण ति सापडत नव्हती. मग त्यांनी एक नविन शक्कल लढवली. ब्रेक मधे, तिचि जिरवायचीच म्हणुन त्यांनी अगरबत्तीला सुतळी बॉम्ब बांधला आणि अगरबत्ती पेटवून ति बसते त्याच्या मागच्या बेंचमधे ठेवली. मी नको म्हणालो ते ऐकायला तयार नव्हते.
वर्गसुरु झाला सगळे तिची वाट पाहत बसलेले. वर्गातल्या सरस्वतीच्या फोटोलापण त्यांनी एक अगतबत्ती लावालेली, पण देवी पावलीच नाही. चंद्रकला येऊन सगळयात समोरच्या बेंचवर बसली. पोरं हिरमुसली. बॉम्ब फुटला सगळे दचकले पण ति दचकलीच नाही, म्हणजे बॉम्ब आहे हे तिला आधीच माहित होते. सुभ्याने माझ्यावर डाउट खाल्ला. चन्द्रकला सरळ प्रिंसिपल सरांच्या केबिनमधे घुसली. थोड़ावेळाने शिपाई पोरांना बोलवायला आला. बरोबर बॉम्ब लावणारी पोरंच त्यानं बोलावून नेली.
"चंद्रकलेने सगळी नांव एकदम करेक्ट सांगितली पण ही पोरं नंतर तिला खुप परेशान करतील" जोशी सर मानगे सरांना म्हणाले.
" अहो जोशी सर! ति खमकी पोरगी आहे तिचं टेंशन नका घेऊ. एक एकाला ति यूं सरळ करल." मानगे सर बोलले.
मी त्याच दिवशी ठरवले करल तर हिच्याशीच् लग्न करल. आपल्या बापाला टफ देण्यासाठी आपल्याला असलंच खंबीर नेतृत्व हवं आहे.
मी तिचा माग काढनं चालु केलं. तिची गृहपाठाची वही घेऊन जायचो. ओळख वाढली. ति दुरहुन आमची नातलग लागत होती पण मी तिला तसं सांगितलं नाही. तिचं घर मी राहतो त्याच्या मागच्या गल्लितच होतं, कधी कधी आम्ही सोबच कॉलेजलायायचो म्हणजे मी एकटा आणि ति मैत्रिणींसोबत. सुभ्या म्हणाला तिला सांगून टाक पण मी प्रथम सत्रा च्या परीक्षा होइ पर्यंत तिला न सांगन्याचं ठरवलं होतं.
दिवस भरभरा निघुन गेले. बापच्या दोन चकरा झाल्या. ते प्रिन्सिंपल सरांना भेटले. त्यांची कुठूनतरी ओळख निघाली.
सुभ्याला वर्गातली एक पोरगी म्हणजे राणी पटली. ति दोघं रोज दुपारी कुठं न कुठं फिरायला जात. मी सुभ्याला खोज काढायला सांगितलं तो म्हणाला तिचिपण तुझ्यावर लाइन दिसते तू घाबरु नगस सांगून टाक तिला. सुभ्याचं म्हणणं ति राणीला माझी खोली विचारत होती.
परीक्षा चालु झाली. पहिल्याच दिवशी मी तिला बेस्ट ऑफ़ लक म्हणालो तिना डायरेक्ट हातच् हातात दिला. पहिला पेपर एकदम बेस्ट गेला. नंतर एकापेपरला तिचा नंबर शेवटच्या बेंचवर आलेला. तिचं पूर्ण वर्गावर ध्यान असावं तिना सात आठ पोरांच्या कोणत्या कोणत्या खिशात कॉप्या आहेत हे पर्यवेशक सरांना अचूक सांगितले. माझ्या दोन्ही खिशात कॉप्या होत्या, उरलेले दीड दोन तास मी तसाच अंग चोरून बसलो. पेपर संपला. तिना माझे नांव सांगितले नाही, मी हवेत तरंगतच घरी गेलो.

शेवटच्या पेपरला जास्त अभ्यासाची गरज नव्हती. रात्री एक दीड तास मी प्रेमपत्रे लिहिले. सुभ्या होताच मदतीला. शेवटी तिन चार मधले एक फाइनल करुण झोपी गेलो. सकाळी उठलो. सुभ्या सकाळीच कुठं गायब झालेला. बराचवेळ तो आला नाही मग मी कॉलेजला जाण्यासाठी खाली आलो. घरमालकाने वडिलांचा नविन मोबाइल नंबर लिहुन घेतला. मी डोक्याला जास्त ताण न देताच परिक्षेला आलो.

पेपर ठीक गेला. चंद्रकला जायला निघाली तिला थांबउन तिच्या हातात चिठ्ठी दिली आणि वर्गातच बसून राहिलो. ति लाजली आणि हसतच बाहेर निघुन गेली.

सुभ्या मला शोधत आला

"यार सकाळी बिड्याच बंडल खिड़कीतून खाली पडलं, म्या ते घ्यायला खाली आलू त् तोहा घरमालक ते चाफत हुता. म्या हळुच सटकलूं"

सुभ्याणं चांगलीच काशी केली होती. घरमालकाने सकाळीच फोन केला असल, आतापर्यंत बुलट पण खोलीवर येऊन थांबली असल. मी डोक्याला हात लाउन बसलो होतो तेवढ्यात वर्गातली दोन पोरं मला बाहेर खुनवु लागले. बाहेर येऊन बघितले तर नोटिस बोर्डवर मी दिलेल्या प्रेमपत्राच्या झेरॉक्स कॉपी लागलेल्या. मी चंद्रकलाला शोधु लागलो, ति ओरिजिनल कॉपी घेऊन प्रिंसिपल केबिन मधे घुसताना दिसली. मी मटकन खाली बसलो. सुभ्याने मला वर्गात आणून बसवले. अता खोलीवर पळून जान्यात ही आर्थ नव्हता. मी तिथेच बसून राहिलो. तासाभराने शिपाई बोलवायला आला. प्रिंसिपल केबिन चा दरवाजा लोटला तर मती गुंगच् झाली. प्रिंसिपल सरांनी कहरच केलेला, आधी बापाला आणि मग मला बोलावलेलं. बापाशेजारिच घरमालक बिड्याच् बंडल घेऊन बसलेला. एवढ्यादिवस बाप फ़क्त कानाखालीच ठेवून द्यायचा आज रांगड्या बापाची लात कंबड्यात पडली. मी झांज येऊन खाली पडलो.

जाग आली तेव्हां मी मळयातल्या लिम्बाखाली बाजावर पडलेलो होतो. एकाबाजुला हिरवागार ऊस तर दुसऱ्याबाजुला गहु. मोटर चालु होती. विहीरितलं पाणी जमीनिवर आदळुन मोड़ा मोडाने गव्हात गुडुप होत होतं. थंडगार वाऱ्याची झुळुक आली आणि चंद्रकलेचं ध्यान झालं. तिचा चेहरा आठवला तशी डोक्यात आग आग झाली, पाय जड़ वाटायला लागला. अंगावरची वाकळ काढली तर पायाला भले मोठे प्लास्टर केलेले. जागचं हलता येईना' पुन्हा तसेच पडून राहिलो. अशी ही तंगडीची गोष्ट बाप 'तंगडं तोडिल' म्हणाला इथून सुरु झाली आणि 'बापाने तंगडं तोडलं' इथे संपली.

# ति, तेव अण म्या..

प्रेषक, आनंद कांबीकर, Thu, 05/11/2015 - 00:23

सगळी मागल्या वर्सातुन फुढं आलेली, म्या एकटाच् नवा. त्याहीच्यात मिसळा मनलं त् म्या खेड्यातला, सुतच् जमाना. वर्गात कई उल्हासच् राइला नवता, पर एकदा तिला हसताना पाइलं अन् सगळा अंगच् नाचू लागला. ति साऱ्या नसाहितातून व्हावू लागली. मागल्या बाकावर बसून, हाताचा कोपाकरुण बोटाच्या सांदीतून तिला टापू लागलो. ति गदगदून हसायची न् म्या खुश व्हायचो. मजाच मजा यायाची. एकदा ति खेटुण गेली अन् म्या अंगाला माराइचा फवाराच् ईकत आणला. दिसभर एकटाच तिच्या मागणं फिरायचु. कदीच्याला बी तिच्यावरच् नजर लावून बसायचो.
ति रोज चोरून मह्याकडच् बघायची पर हळू हळू ध्यानात आलं, ति माह्या शेजारी बसणाऱ्या विश्याला चोरून पायची. तेव दिसला कि पोरी तिला कोपरं हानायच्या. पोटात आग आग व्हायला लागली. विश्या दिसला कि दगुड उचलायचा इच्चार मनात यायला लागला. पर इलाज नवता. तेव गाडी घीऊन येणारा वर्गात एकटाच. तेव किरकेट बी खेळायचा सारे पोरं पोरी त्याच्यावर जाम खुश. एकदा विश्यान् ग्राउंड मदी गाडी घातली अन गोल चकरा हानल्या. ति खुळयागत त्याच्याकडं पाह्त बसली. तव्हा डोकं खनकलं. सुन्याच्या दप्तरातून करकटक काढलं अन् लपत लपत विश्याच्या गाडीच्या दुंही टायरातून हवा काढली. वर्ग सूटल्यावर तेव गाडी ढकलत निगाला, ति पोरिहिच्या घोळक्यातून त्वांड पाडून पाहत हुती अन् म्या लपून मजा घेत हुतु. त्या दिशी लए आनंद झाला.
म्या तिच्यावर जिव ओवळायचो अन ति त्या फुगीर विश्यावर. पर दोघायचं अजुन जमलं नवतं. दोघं बी एकमेकाईला नुसतं चोरून पायचे. अजुन पक्क झालं नव्हतं. पर मनी त्याहीचं पक्क करायच्या इराद्यात हुती, दोघायच्या मदी सारखी लुडबुडायचि. 'ति' लाजायचि पर मनी विश्यासंगट बडबड करायची, 'ति' ला विश्याच्या नावानं हाकांमारुन मोठ्यांन् खिदळायाचि. मनीचं पारगांवच्या रम्यासंग चालु हुतं. म्या मनी वर ध्यान ठीवायला चालु केलं.
एकबार शेवटचा पीरियड संपल्यावर सगळी पळाली. मनी एकटीच वर्गात थांबली. म्या चुपचाप बाजूच्या वर्गात जाउन बसलू. रम्या वर्गात घुसला, त्यानी आतून दार लावलं. मनी अन तेव दोघच् आंत. म्या हळूच भायरून कड़ी घातली. पळतच खाली आलू अन् "वरच्या मजल्यावरच्या २०१बी वर्गात पिसाळं कुत्रं शिरलय. म्या कड़ी घालून आलू. तुमि जा लवकर" असं शिपयाला सांगून टाकलं. शिपाई अजुन दोन शिपइं, मोठी काठी अन चार दोन धीट पोराइला घेऊन वर गेला. म्या पळून आलू. रातच्याला मेसवर दोन चपात्या जादा खाल्ल्या. सगलिकड़ं बोभाटा झाला. मनीचं कॉलिजात येणं बंद झालं, म्या जाम खुश. मनी हुती मनुन ति जास्तीची हिम्मत करायची, अता उलशिक निवाळली.
मंग माही हिम्मत व्हाढली. एकदा तिला लेडीज हतरुमाल दिला, तिना वापस दिला. मनलं पिरेम हळू हळू हुईल्. चार दिसान् मेकपचा डबा दिला, तिना वाकडं थुबाड करुण तेव बी मागं दिला. एकदा विश्या नवा कोरा पेन पाकीटात घालून घिउन आला अन तिला गिफ्ट द्यायच्या हिंदनानं भायर थांबला. म्या दप्तरात काचाचा ताजम्हल आणलेला. वर्गात घुसून

तिच्या म्हवरं ठीवला. ति चवताळली. महल घिउन मह्या मागन् आली. विश्या सुन्याबर लांब हुबा, म्या सुन्याला आवाज दिला तस्स दोघायनि माहयाकडं पायलं. तिना ताजम्हाल् माह्या हातात ठीवला. "पुन्हा कई देशिल त् मुस्काटच् फोडिल" मनली. ति वर्गात घुसली. सुन्या अन विश्याला कई ऐकायला गेलं नवतं. म्या जवळ जाउन त्याहिला महल दाखिला अन जोरात "यार ति पोरगी म्हागच लागलिया. सारखं कई न कई आणून देती" मनलं. सुन्याच्या खांद्यावर हात टाकून बोलत हुतो तवा म्या तिरप्या नजरानं पाइलं. विश्यान् हातातल्या पेणाचे टुकड़े केले अन तेव गाड़ीकडं निघुन गेला.

# एक बारकुसं लफडं

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 01/11/2015 - 23:43

एकदाची सोम्याजवळ चिठ्ठी दिली, घरी येऊन जेवण केलं अन गच्चीवर जाऊन चंद्र-तारे पाहत निवांत पडून राहीलो. पर मनात धाकधुक चालूच. जर तिला आवडलं नई अन ति बापाला घेऊन घरला आली त? आपल्या बापाचं जाउद्या, तिचा बापच फोडून काढिन. त्याची मिशि पाहुनच पार गळपटायला हुतं. तेवअख्ख्या गावांत इज्जत घालल. च्याला भलतीच् भानगड़ करुण बसलोय. सोम्याला फ़ोन करुण नकु दिउ म्हणाव त् वरुण तेवच् फाटली का म्हनल. जाउद्या होउ दया काय होइचं ते. खाली गेलू. दप्तर घेतलं. आये ला दिन्याच्या घरी अभ्यासाला चाललू सांगितलं अन घरामागं आलू. दत्तूअण्णा शेतात रहायला गेलेला. त्याच्या पत्र्यावरून फिरसे गच्चीवर येऊन निजलो.
सकाळी उठलो तव्हा चंद्र जाउन सूर्य आलेला. घड्याळात साडेसहा वाजलेले. चिठ्ठित

लिव्हल्यावाणी, "रोज सकाळी 7 वाजता तुला मंदिरात जाताना, बालवाडी जवळच्या लिम्बाखालुन जिव लाऊन बघतो. तू पण बघत जा." म्या बराबर 7 वाजता लींबाखाली हवा.
खाली यिउन फट्दिशी अवरले. आय, 'हेव दिन्याच्या घरी गेलता गच्चीवरुण कसा आला' ह्या विचारात तव्हर म्या लिंबाखाली. वान्याचा आशा तीथं हजरच. हेचा पण तिच्यावरच डोळा. हिकडं कसा विचारलं त् म्हणतु 'आलतू दर्शनाला.'पारस्या तोंडान् ह्याच्या आज्यानं दर्शन घेतलं हुतं?
ग्रामपंचायतच्या कोपऱ्यावर ति दिसली. चिठ्ठित लिहिल्याप्रमाने, " तू गुलाबी डिरेस मदे झक्कास दिसतेस. एकदम गोड. रोज तेवच डिरेस घालत जा." ति गुलाबी डिरेस घालून आली. जवळुन जाताना ति चिठ्ठितल्यावाणी बारीक हसली. कपटी आशा म्हनला 'तुह्या नाकाला लय पावडर लागलीय म्हणून हसली'. म्या त्याच्याकडं ध्यान दिलं नई. ति दर्शन घेऊन गेली. म्या नाक चोळत घरी आलू.
वर्गात तिना बरेचदा माह्याकडं पाहुन बारकं हसु फेकलं. चिठ्ठीची जादू दुसरं काय. पर खडूस पोरं म्हणली तू आज इन केलिस मनून सगळेच हसताय. म्या फकस्त तिलाच हस्ताना पाइलं. सगळीच पोरं एकजात बावळट. सोम्या हुशार पर तेव आज वर्गात आला नव्हता. चिठ्ठित लिव्हल्यावनी ति सांच्याला दुकानात गेली. म्या बी गेलु. म्या हळूच तिच्या हाताला शिवलु. ति मला एडपट मनली. म्या डोक्याला तान दिला तव्हां ध्यानात आलं, दुकानदार बघत हुता मनुन ति मला एडपट मनाली. मंग निवांत झोप लागली.
सातला पूनः लिंब गाठला. आशा तिथं माह्या आधि हजर. सोम्या पण. ति आली. चिठ्ठित लिव्हल्यावनि आज बी गुलाबी डेरेस घालून. म्या लए खुललो. तिला बघुन सोम्यानं खिशातहात घातला अन एक कागदाचं लगदाळ माह्या हातात ठिवित मनला 'च्याला! त्या दिशी चिट्टी दयाला इसरलु. मयींन पैंट धुतालि हेव बघ सगळा लुगदा झाला.'
मह डोकं फिरलं. सोम्या गधड़ा. सगळया वर्गात सोम्या गधड़ा.

# सडक...

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 25/10/2015 - 13:45

आमदार संपतरावांनी उदघाटन केले आणि सोनटाकळी ते बोरगाव रस्त्याचे काम चालु झाले. कांट्रेक्टर कासलीवालला साहेबांनी स्पेशल सूचना देऊन महीनाभरात कोसभराचा

पक्का डाम्बरी रस्ता करवुन घेतला. दोन गाव एकमेकांना जोडली गेली. तालुक्याला जायला सोपं झालं. खाजगी वहानांची वर्दळ वाढली. जिथे दिवस जायचा ते काम घंटयात होउ लागलं. लोक आपल्यावर जाम खुश असणार असा विचार करुण साधारणता महिनाभराने संपतरावांनी सोनटाकळीचा दौरा करायचं ठरवलं. साहेबांना त्या कोसाभराच्या नव्या कीरिंग रोडवर साधारणता सात ते आठ स्पीडब्रेकर लागले म्हणजे गाडी आदळतच टाकळीला आली. चौकशी केल्यावर समजले की सात ते आठ ठिकाणी तो नवा किरिंग रोड कापला गेलाय. साहेब संतापले. सरपंचाला विचारल्यावर तो म्हणाला, सड़क झाल्यावर दोन दिवसांनी रमनला कालव्यातून पाइपलाइन करायचे सुचले नंतर जगनला सुचले, चार दिवसांनी शेतात राहणाऱ्या चंपा अत्याच्या गनुने समोरच्या तारेवर अकड़ा टाकून 'अंडरसड़क' वायरिंग केले. मग असच काही वस्तीवर राहणाऱ्यांनी वाहनं जोरात पळतात, मुलं ख़ेळत असतात, म्हणून कुदळीने खनुन स्पीडब्रेकर तयार केले. या चार दोन लोकामुळे साहेबांच्या आनंदावर विरजन पडले ते आणखी भडकले. त्यांनी ग्रामसेवकाला अधिक चौकशीसाठी पाठवले. चौकशीतले जबाब:
"मी एकटाच दिसलो का तुमाला? बाकीच्यायनि खनले ते बघा ना?" रमन.
"पाइपलाइन का अभाळातुन करूं मंग?" जगन.
"कुंत्या कलेक्टराची गाडी इनार हाय कनु ह्या रोडाव्हर?" चंपाअत्या.
"भौ सरकारी पैका मजी आपलाच पैका. काय बीघडलं उलसक् खंदलं मनून. शेवटी लेकरं आदिक की रोड आदिक?" वस्तीवाले.
"भौ मह्याजवाळ कुठं कार हाय, माही बैलगाड़ी त् कश्यातुन बी पळती. कहयाला बांधला रोड? पोट्टे आंधळयावाणी गाड्या हानत्याय." दूसरा वस्तीवाला.
शेवटी निवडणुका जवळ आल्यात, ही बी मानसच हाइत असा विचार करुण संपतराव आल्यावाटेने आदळत आदळत वापस गेले.

# फेर..

प्रेषक, आनंद कांबीकर, Thu, 22/10/2015 - 12:44

एस टी तुन उतरलें तेव्हा बरीच रात्र झालेली. पाऊस थांबला असला तरी ढगांचा निचरा झाला नव्हता. पुन्हाकधी बरसायला सुरुवात होईल याचा नेम नव्हता. तिथुन गांव अजुन कोस भर दुर. लवकर गांव गाठायला हवं तसच ओढाही भरला असल याचा अंदाज घेत त्याने मधली वाट धरली. मधेच एखादी विज चमकायची आणि वाट दिसायची. तो वाट

काढत समोर तर दोन वर्षाच्या चिमुरडीला छातीशी कवटाळुन ती त्याच्या मागं. पायाला चिखलाची लगदाळं चिकटलेली. मधेच एखादा काटा पायात घुसुन रक्तासगट बाहेर यायचा, आग मस्तकाला भिडायची.
पोरगी सारखी बिमार पडते. गांवातल्या डॉक्टरला बरेचदा दाखवलं पर पोरीला गुण येईना. सारखी रडत असते. शेवटी डाक्टरच म्हणाला, भाइरलं बघा. शेजाच्या साखरा आजिचं तेच म्हाणनं आलं. बुढगांव च्या पीराखाली एक देवलसी बसतो. त्याच्याकडे घेऊन जाण्यासाठी त्याची महतारी मागं लागली. तिन दिवस झाले पोरिला झोप नव्हती. म्हातारीची कुरकुर वाढली. शेवटी टपरीवाल्यां पप्याकडून पाचशे उधार घेऊन तो मुकाम्या गाडीन् गावातुन निघाला. पोरीचे रडने चालूच होते. पिराला वहायला म्हातारिन् घरातून सात लिम्बं दिली होती ती त्यानं एस टी तुन फेकून दिली आणि सरळ शाहरातला दवाखाना गाठलेला. तिथेच रात झाली, मुकामी गाडी हुकलि म्हणून दुसऱ्या गाडींन याव लागलं.
वाट काढत दोघ टेकडीवर आले. तो खड़काळ भाग, गांव चा मसनवटा. पोरगी शांत झोपलेली. अंतरावर मढं जळत होतं, त्याच्या उजेडांत झपझप पाय उचलत दोघेही गांवच्या वेशीतून आंत शिरले.

# सत्य घटना

प्रेषक, आनंद कांबीकर, Mon, 19/10/2015 - 18:09

सिंहगड ने पुण्यातुन निघालो.नेहमी प्रमाणे ट्रेन तुडुंब भरलेली. दरवाज्या जवळच्या पैसेज मधे श्वास घेत उभा होतो. समोर एक मुलगा,साधारणता विशितला, स्वताच्याच् बॅग वर बसला होता. खेड्यातला असावा आणि मुंबईला कुठेतरी कामाला असावा. त्याच्या जवळ तळहातात मावनार नाही असा फ़ोन होता. तसा तो काहीखुप महागडा वगैरे नव्हता. म्हणजे चीन चं् मॉडल असावं.
लोनावला क्रॉस केल्यावर एक विक्रेता आला. त्यामुलाने मोबाइल साठी स्क्रीन गार्ड विकत घेतले. विक्रेता ९० ला वगैरे म्हणतहोता पन घासाघिस करुण त्याने ते ७० ला घेतले.
आपले अगोदरचे काढून फेकून दिले. नविन मधे ७० ला तिन मिळाले होते.
एक घेतले फ़ोन वर बसवले. थोड़ी हवा आत राहिली म्हणून एका बाजुन उचकटले तर ते चोळा मोळा झाले. तो दरवजात बसलेला असल्यामुळे ते गार्ड ही काढून फेकून देने त्याला सोपे गेले.
मग त्यांने दूसरे स्क्रीन गार्ड काढले. बसवायच्या धांदलित ते हाताला चिकटले. ते ही फेकावे लागले. मग तो थोडा वेळ तसाच बसून राहिला.
त्याची तगमग वाढली. त्याला रहवेना. बॅग ची चैन ओढुन त्यानं शेवटचे स्क्रीन गार्ड ही काढले.

हळू हळू. एकदम काळजी घेत त्यानं ते बसवायला सुरुवात केलि. डोक्यात ७० रुपये होते. डोळे ताठरले. हात थोडा थरथर ला आणि ट्रेन चा थोडा हादरा बसला. स्क्रीनगार्ड अर्धा मोबाईल वर अन अर्धा बोटावर गुंडळाला गेला. मुलाचा ताल गेला. रागात त्यानं गार्ड चा चोळा मोळा केला अणि फेकून दिला.
मोबाइल खिशात ठेवला आणि दोन्ही हातात छेहरा धरून बाहेरची पळती झाडे पाहू लागला.

# चोरी

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 27/03/2016 - 02:52

उंच टेकडीवरचे जुनाट दगडी मंदिर. सीमेंट च्या रस्त्याने मंदिराच्या टेकड़ीला गोल चक्कर घातलेली. रस्त्याच्या दोन्ही बाजुला दाट झाडी आणि नंतर तब्बल दहा फूटी भिंतीचे कुंपन. आत जायला दोन मोठाली प्रवेश द्वार.
एका प्रवेशद्वाराला खेटुनच असलेल्या सिसाच्या डेरेदार झाडाखाली म्हातारी आणि तिचा नातु गोधड़ीवर लोळत पडलेली.
"ये आजे! उथ ना! मया लय भुत लादली" पेंगुळलेल्या आजीला त्यानं दोनदा हलवलं पण तिना काहीच प्रतिसाद दिला नाही.
मग तो झाडाच्या सावलीतून बाहेर आला. रस्त्याच्या कडेला बांधलेल्या कठड्यावर उभा राहुन त्यानं मंदिराच्या पायऱ्याकड़े बघितले. लोकांची वर्दळ वाढलेली. पळत येऊन त्यानं म्हातारीच्या उशाला असलेल्या गोणीतली परात काढली आणि पायऱ्याकड़े पळाला.
पेंगुळलेल्या म्हातारीने तो पायरीपर्यंत जाउस्तवर त्याच्याकडे बघितले आणि परत कुस बदलून झोपी गेली.
पायरी उतरणाऱ्या आणि चढणाऱ्या लोकांपुढे परात धरून तो फिरू लागला. पायाला तापलेल्या पायरीचे चटके बसु लागले तेव्हा झाडाची पानं गोळाकरुन एका जागी उभा राहिला. पण कुठल्यातरी नववारि नाटी घातलेल्या बाईने टाकलेले दोन आठआणे सोडले तर अर्धा तास पायपिट करुन ही त्याच्या परातीत काहीच पडले नव्हते. शेवटी डोक्याला उन्हाचे चटके बसु लागले तेव्हा पाय चोरत पळत तो म्हातारि जवळ आला. म्हातारी अजुनही झोपेतच. दोन्ही आठअणे मुठीत घट्ट धरून आणि परात तिच्या उशाला ठेऊन तो प्रवेशद्वाराच्या बाहेर आला.
बाहेर चे सगळे वातावरण गजबजलेले. अंतरा अंतराने भेळ-पुरीची दुकानं, फुगेवाले, खेळणीची दुकानं, कसल्या कसल्या वस्तु घेऊन इकडे तिकडे मिरणारे हातगाड़ी वाले.
हातातले दोन आठाणे आणखी घट्ट धरत तो भेळीच्या दुकानाजवळ आला.
भेळीवाल्याने भुवया उंचावल्या तसं त्याने हातातले दोन आठाने दाखवत भेळ मागितली.
"जा, हौर पैसे ला! इतने में नै आती भेल!" म्हणत भेळीवाल्याने त्याला हकलले.
मग तो हातगाड्यावरच्या चेंडूची खरेदी करायला गेला, त्यानं ही हकलुन दिले.

एवढ्यात फुगा तरी येईल या अपेक्षेने तो फुगेवाल्याकड़े गेला.
"हे असले आठ आठाने चालत नई रे आता! जाय दुसरे पैसे आन!" म्हणत फुगेवाल्याने पण त्याला पिटाळले.
तो पार वैतागुन गेला.
म्हातारी अजुन झोपेतच होती.
ते दोन आठाणे गोणीत टाकून तो मंदिराच्या पायऱ्या चढु लागला.
वरती देव दर्शनासाठी लागलेल्या रांगेत येऊन उभा राहिला.
रांगेत सरकत सरकत तो गाभाऱ्यात ठेवलेल्या मूर्ती पुढे आला.
सोन्याचा पत्रा बसवालेल्या गाभाऱ्याच्या उंबऱ्यावर एक भली मोठी परात ठेवलेली.
दर्शनाला आलेले भाविक त्यात पैसे टाकत. कुणी चिल्लर तर कुणी दहाची, विसची, पन्नासाची किंवा शंभरची नोट त्या परातीत टाकत आणि परातीत ठेवलेला साखरफुटाना प्रसाद म्हणुन उचलत.
पोराने इकडे तिकडे पाहिले आणि साखरफुटाना उचलायचे नाटक करत एक दहाची नोट उचलली. तेवढ्यात आतून एक टप्पू हात बाहेर आला आणि त्याने गचकन पोराचा हात पकडला. त्यानं झटका देऊन पळायचा प्रयत्न केला पण त्या हातासोबत अडदांड उघड़ाबंब पुजारी गाभाऱ्याच्या बाहेर आला.
"देवाच्या घरात चोरी करतोस काय रे राक्षसा?" म्हणत त्यानं पोराच्या कनाखाली लावली व हातातली नोट काढून घेतली.
पोरगं थरथरु लागलं. पूजाऱ्याने त्याला ओढ़त पायरीजवळ आणलं. त्याच्या पाठीत आणखी एक गुद्दा घालुन त्याला पायरीवरून लोटले.
"फिरून मंदिरात दिसला तर तंगडं तोडिल" म्हणत पुजारी निघुन गेला.
पोरगं रडत रडत म्हातारीजवळ आलं.
त्याच्या हुंदक्यानं म्हातारी जागी झाली.
"काय झालं ग माझ्या सोन्याला" म्हातारीनं त्याला जवळ घेतलं. कुणी मारलं? का मारलं? हे विचारण्यात काही अर्थ नव्हता. तिना त्याला थापटुन थापटून झोपी घातलं.
तो झोपल्यावर म्हातारिणे गोणीतून हळदी कुंकु काढले, एक कुठल्या तरी देवीचा छोटासा फोटो काढला. ते सगळं परातीत व्यवस्थित मांडलं. स्वतःला कपाळभर कुंकु लावलं, गळयात मोठाल्या मन्यांची तुलसीमाळ घातली आणि मंदिराच्या टेकड़ीला गोल चक्कर घालनाऱ्या सीमेंट रस्त्याने निघाली.
रस्त्याच्या दोन्ही बाजूने झाडं लावलेली तसेच त्याखाली बसायला सिमेंटचे कठडे बांधलेले.
म्हातारी एका कठड्याजवळ आली. एक जोडपं बसलेलं. म्हातारीने पंजाबी घातलेल्या मुलीच्या पायाकडे बघितले नंतर गळयाकडे बघितले.
"लै भाग्यवान हैस पोरी! तुला मनासारखा जोड़ीदार भेटलाय" म्हणत म्हातारीने पोरिच्या कपाळाला कुंकवाचे बोट लावले व ताट तिच्या प्रियकरापुढे धरले.
त्याचा चेहरा खुलला. पाकिटातुन पन्नासची नोट काढुन त्यानं ताटात टाकली.

पुन्हा एकदा त्यांच्या डोक्यावरून हात फिरवत म्हातारी पुढच्या कठड्या कडे निघाली.
पायातले जोडवे, गळयातलं मंगळसूत्र पाहुन म्हातारी ने त्या साड़ीवाल्या पोरिला कुंकू लावले आणि लवकरच पाळणा हलनार बोलली. त्या जोडप्याने दहाच्या तिन नोटा म्हातारीच्या ताटात टाकल्या.
नंतरच्या कठड्यावर बसलेल्या जीन्स टीशर्टवाल्या पोरीने आणि तिच्या मित्राने तोंड फिरवले. मग म्हातारी पुढे सरकली व दोघांच्या तोंडासमोर ताट धरून तिथेच उभा राहिली. शेवटी वैतागुण त्या पोरीने पर्समधून एक रुपया काढून परातीत टाकला तेव्हा म्हातारी तिथून निघाली.
पुढे असेच एक एक जोडपे घेत म्हातारी निघाली. काहींनी तिला हकलले तर काही स्वतः उठून गेले.
शेवटी म्हातारी वापस सिसाच्या झाडाखाली पोहचली.
नातू अजुन झोपेतच होता.
ताट गोणीत व्यवस्थीत ठेवून तिना पुडक्यात आनलेली भेळ सोडली आणि नातवाला उठवलं.
भेळ पाहुन त्याला आनंद झाला. भेळीचा पहिला घास त्यानं म्हातारीला भरवाला आणि गळयात पडून तिचे मटामट मुके घेऊ लागला.

# नेते

प्रेषक, आनंद कांबीकर, Sat, 04/06/2016 - 01:20

एक तर तो कधेमधेच कॉलेजला येतो आणि दुसरं म्हणजे वर्गात आल्यावर तो एखाद्या राजकीय पक्ष्याच्या कार्यालयात आल्यासारखा वागतो.
म्हणजे त्याची एंट्रीच कशी जबरदस्त असते पहा;
वर्ग चालु होऊन चांगला अर्धा तास झालेला असणार, एखादा पॉइंट घेऊन शिक्षक रंगात

आलेले असणार, आणि तेवढ्यात हा उपटतो;
"आत येऊ, सर"
खरं तर त्याचे विचारणे कधी प्रश्नार्थक नसतेच कारण हे वाक्य संपेपर्यंत त्याचा संबंध देह वर्गात घुसलेला असतो. आणि शिक्षकांना
"या! या! या!" म्हनुस्तव्हर याने पहिल्या बेंचवरच्या पोराच्या हातात हात देऊन, कोपऱ्यात बसलेल्या पोराला डावा हात उंचावून 'सलाम' करत, पहिला बेंच मागे टाकलेला असतो.
पुढे सरांची भंगलेली तंद्रि आणि सरकलेली शीर 'उलटे दहा अंक मोजून' जागेवर येऊस्तवर हा शेवटच्या बेंचवर दाटीवाटी करुन स्थिरावलेला असतो.
म्हणजे शिक्षकगण काही करत नाहीत अश्यातला भाग नाही तर ते सर्वगण सर्व प्रकारचे प्रयोग करुन थकलेत.
आता तर त्यांनी आपल्या डिगऱ्या सोबत चिकटुन आलेल्या उरल्या सुरल्या अहंकाराला झटकुन त्याच्यापुढे सपशेल हात टेकलेत.
गळयात पावकिलोची सोन्याची चैन, हातात सोन्याचे जाड्जुड़ ब्रेसलेट, काळयाखप अंगावर भड़क रंगाचा सदरा, निळी किंवा पांढरी जीन्स घातलेला मन्या कुठेही दिसला की मास्तर लोकांना धड़कीच् भरते. एकतर तो नेहमी बिनधास्त आणि वरतून निर्लज्ज.
सभ्यता, सुसंस्कार, आदर या सगळया भेकड लोकांच्या निरुपयोगी गोष्टी असतात असा त्याने पक्का समज करुन घेतलेला.
मास्तर लोकांना कसे अपमाणीत करायचे यात तो एकदम प्रवीण झालेला. उदाहरणार्थ एखादे सर तास चालु असताना मधेच काहीतरी विसरले किंवा एखाद्या प्रश्नाचे उत्तर त्यांना आले नाहीतर त्यांची पंचाईत होते, घाम फुटतो, धांदल उड़ते, पोरं तोंडावर हात ठेवुन बारीक हसतात तेव्हा हा मोठ्याने म्हणतो;
"सांभाळून घ्या रे! मास्तर आपलेच हेत!"
पण अश्याने होते काय की त्याच्या अश्या वागण्या मुळे सगळा वर्गच् बिथरतो आणि शिक्षकाचा वर्गावरचा ताबा सुटतो. मग बिचाऱ्या सरांना वर्ग सोडुन बाहेर येण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. आणि परत प्राचार्यांकडे जावे तर काय सांगणार?
मी वर्गात अमुक अमुक पॉइंट विसरलो? किंवा
मला या या प्रश्नाचे उत्तर आले नाही?
बिचाऱ्या सरांची अनखिनच पंचाईत होते.
एकदा मिस कोमटेकर मॅडमचा तास चालु होता. हा ठरल्याप्रमाणे वर्गात घुसला तसाच बाईंच्या तळपायांतून मस्तकात शिरला.
बाई रागाच्या भरात मुर्ख, नालायक, बेअक्कल इ.इ. म्हणत राहिल्या आणि निर्ढावलेला तो खाली मान घालुन ऐकत राहिला.
पण बाई जेव्हा, "मंद आहेस का रे तु?" म्हणाल्या तेव्हा त्याचे डोळे रागाने गरागरा फिरले. तो टेकुन बसला आणि एक सारखे मॅडम कड़े पाहु लागला. त्यांना जानवले. त्या चपापल्या व फळयाकड़े तोंड करुन शिकवायाचा प्रयत्न करू लागल्या. तेवढ्यात तो हात फैलावुन

अनखिनच रेलुन बसला आणि खर्जातल्या आवाजात, एखादा रांगडा गड़ी तमाशातल्या बाईला 'होउद्या अजुन एकदा' म्हणतो तसे,
"बाई, परत पैल्या पास्न तास सुरु करा. आपल्याला काय बी समजलं नाय!" म्हणाला.
बाईंनी न ऐकल्या सारखे करुन फळयावर लिहायला सुरुवात केली.
मन्याचं डोकं सरकलं. त्यानं बाकड्यावर जोरानं हात आदळला.
"बाई, आपुण अख्खी फि भरलिया अण वरतून डोनेशन बी दिलाय. बाई,आता हितच् शिकिता का...?"
पुढं बोलायची गरज नव्हती. तो वाक्य अर्धवट सोडतच वर्गातल्या पोरायकडे पाहत मोठ्याने हसु लागला.
बाई सुन्न झाल्या. त्या तश्याच भरल्या डोळयांनी प्राचार्यांच्या कार्यालयात घुसल्या.
घडला प्रकार ऐकल्यावर त्यांनी त्यावर्गावर शिकवणाऱ्या इतर शिक्षकांना ही बोलावून घेतले.
सगळयांनीच् एक एक करत त्याची कुंडली मांडली. त्याच्या एकटयामुळे संपूर्ण वर्गावरचे नियंत्रण सुटते आणि आताच असा तर पुढच्यावर्षी अणखी डाम्बरट होईल या दोन प्रमुख गोष्टींचा विचार करुन प्राचार्यांनी मन्याच्या वडिलांना (मन्याच्या भाषेत फादरला) ताबडतोब कॉलेजमधे येण्यासाठी फोन केला.
दुसऱ्या दिवशी मन्याचे फादर आले ते सरळ डायरेक्टर सरांच्या ऑफिसमधे घुसले.
थोडावेळाने प्राचार्य सरांना आणि बाकी स्टाफला बोलावने आले.
सर्वजन आत येऊन उभा राहिले. डायरेक्टर सरांसमोर येण्याची हिम्मत होत नसली तरी आज इथे एकजुटीने त्यांना मन्याचा बंदोबस्त करायचा होता.
"नमस्कार मास्तर, आपुण मनोज चा फादर" प्राचार्य सरांकडे पाहुन बोलू लागले "काल मुबाइलवर तुमचा फोन आला म्हणलं चला डायरेक्ट भेटूनच येऊ अण लगीच आज आलू बघा"
"त्याचं काय आहे साहेब... की काल आमच्या मॅडम... हे...आपला मनोज..." थोडं घाबरत थोडं डायरेक्टर सर कड़े पाहत प्राचार्य बोलायचा प्रयत्न करत होते तेवढ्यात मनोज चे फादरच बोलले;
"त्याचं काहेना मास्तर, आजकालची पिढीच् लै डाम्बरट. नाव कुणाला आवरत नाय. म्हणून म्या म्हणतू.." सगळया मास्तरांकडे पाहत "आपुनच थोडं समजून घ्याया पायजी. आता तुमचंच बघाना. तुमाला सगळयाला थोडच् नीट शिकिता येत असणार? तुमच्यात बी असलच ना एखादं हुकलेलं पर डायरेक्टर साहेब घेतातच ना समजून. तवा तुमीच थोडं लवतं घ्या.."
कोमटेकरबाईंना रडण्याचा आवेग अवरेना. त्या तिथेच फुस फुस करू लागल्या.
त्यांच्या फुसफुस कड़े सपशेल दुर्लक्ष करत मनोजचे फादर पुढे बोलू लागले;
"त्याचं काहे ना मास्तर, आपल्याला हुती पन्नास एक्कर जमीन त्यातली एका कंपनीला धा एक्कर इकली अण बाकीच्यात दिलं पलाटं पाडून. लै दाबून पैसा यितुया. तेला ह्या असल्या शाळा- कोलेजं शिकायची बी गरज नै पर आपले डायरक्टर साहेब बोलले घ्या अडमिशन

तवा मनलं जाउद्या इल एकाधं सर्टिफिकट बैठकीत लावाय अण धाडलं पोराला इकडं"
मनोजच्या फादरने थोड़ा स्टॉप घेतल्यावर बराचवेळ शांत बसलेल्या डायरेक्टर साहेबांनी तोंड उघडले;
"बघा ज़रा! करा कईतरी, एक तु अडमिशनं येत नैत अण वरुन तुमी पोरायला तरासं देता. कश्या करायच्या तुमच्या पगारी?... अं?"
डायरेक्टरचे बोलणे ऐकून मनोजच्या फादरला आणखी जोर चढला;
"आपला तेव एकुलता एक छोकरा हे, तेला आपुन तळहाताच्या फोडागत जपतु. तवा तुमीबी प्रेमानं चलु दया.." पुन्हा मॅडमकड़े पाहत; "काय मैडम?"
मॅडमची थांबलेली फुसफुस पुन्हा चालु झाली.
डायरेक्टर साहेबांनी जायला सांगितल्यावर सगळे मास्तर प्राचार्य सरांसोबत खाली मान घालून बाहेर पडले तेव्हा पायऱ्याजवळ उभा असलेला मन्या सोबतच्या शिव्याला मोठ्यांनं म्हणाला;
"याहेच्या महिन्याच्या पगारी येवढी तु आपल्या फादरची दारुची उधारी हाई"

# आयड्याबाज

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 05/06/2016 - 16:37

गांव जन्मल्यापासून म्हणा किंवा मग देशात आमदार-खासदार निवाडायची प्रथा चालु झाल्यापासून म्हणा, पहिल्यांदाच या गावाला कुणी आमदार भेट द्यायला येणार होता. मागचे इलेक्शन झाल्यापासुन जवळपास पाच वर्षात या गावाची लोकसंख्या दोनावरून चारावर गेली. बहुदा त्याचेच गणित बांधुन ही भेट योजिलेली असावी.
ग्रामपंचायतीच्या कार्यालयात सरपंच विनायकराव एकटेच डोक्याला हात लाउन बसलेले. पाच दिवसांनी आमदार साहेब येणार ही गोष्ट त्यांना आजच समजलेली. ती समजल्या पासून विचार करुन करुन त्यांच्या डोक्याचा पार खुळखुळा झालेला. आता पुढल्या दोन चार महिन्यात आमदारकीचे मतदान. म्हणजे साहेब आले की जाऊन थेट लोकायलाच भेटनार. अण मग गावातले लोक त्यांना आपल्या चाढया सांगणार.
ते आपल्या पक्षाचे असते तर त्यांना ग्रामपंचायतमधे आणून पार मंजूर करुन आनलेल्या योजनांपासून ते थेट सरकार कडून आलेले अनुदान आणि त्याचा विनियोगपर्यंत सगळी कागद-पत्रं दाखीविली असती. पर हूंबल अशी झाली कि ते पडले विरोधी पार्टीचे म्हणजे आम्ही विरोधी पार्टीचे अण ते सरकार मधले. नको त्या त्या लोकायला, पत्रकारायला बोलावून ते आपली चप्पी करणार! आणि दाखविल्याल्या कागदांची पुंगळी करणार!
विनायकरावांचे टेंशन वाढतच चाललेले. सरकार कडून एक ना एक रुपया वसूल केलेला पर केलं कैच नै. आता पाच दिवसात करुन करुन तरी काय करणार.
गल्लो गल्ली सूर्यावरचे लाईट बसिवनार?
का बोळी बोळीने सिमेंट हाथरून रस्ते करणार?
का हाई ते रस्ते खांदुन नळं बसिवनार?

का पसरररलेली बेंदाडि जमा करुन नाल्या बांधनार?
का सगळयायच्या घरावरचे आकड़े काढून लाईटी बंद करुन टाकनार?
(सालं आकडे काढले तर सारा घोटाळाच् हुइल. अख्ख गाव त् अंधारात जाईलच जाईल पर ग्रामपंचयतच्या लाइटिची बी पंचायत हुइल.)
अण मागच्यावर्षी तयार केलेला, गावाला राज्यमार्गाशी जोडनारा, पाच किलोमीटरचा डांबरी रस्ता कुठून आनणार? त्यातली त्यात साहेबांच्या गाडीला पांधितल्या खड्ड्यात झटका बसला त् ते आल्या आल्याच् चढनार!
सरपंच फुल स्पीड मधल्या पंख्याखाली घाम पुसत बसलेले. तेवढ्यात ग्रामसेवक हातात पेपर घेऊन उसळतच आले;
"भौ, सरकारानी लै झक्कास नविन योजना काढलिया..."
"करा मंग तिची पुंगळी"
सरपंचाचा बिघडलेला मूड पाहून ग्रामसेवक जरा वरमले.
"कुठं उधळले होते मागचा हाप्तभर?"
"मव्हरल्या शिक्षणासाठी पोरगं आमरिकेत गेलं. त्याला वाटं लावाय गेलतो"
"हिथं आमची पार लागून राहिली अण तुमी फिरा..." पुढचे शब्द गिळत सरपंचांनी राग आवरला आणि आमदार येणार असल्याची गोष्ट सांगितली.
"भौ, लै तरास करुन घिऊ नगा. निघन कै तरी मार्ग...चला.. उठा एखाद्या ढाब्यावर बसु. मला त् भूक बी लागलिया" ग्रामसेवकाने त्यांना हाताला धरून उठवले.
हां ग्रामसेवक लांबच्या कुठल्यातरी जिल्ह्यातला. राज्यातल्या बऱ्याचश्या गावातल्या योजना खात खात या गावात येऊन ठेपलेला. चांगलाच मुरलेला. गावातल्या लोकायचा, सरपंचाचा, मोठ्या अधिकाऱ्याचा, मोठ्या पुढाऱ्याचा कसा मुड सांभाळायचा याची त्याला चांगलीच अटकल आलेली.
त्याने टपरिवर उभा असलेल्या दिन्याची मोटरसायकल मागून घेतली आणि दोघे ढाब्याच्या दिशेने गेले.
रात्रि आल्याबरोबर सरपंचांनी ड्राईवरला घरापुढच्या दोन्ही बोलेरो मळयात नेउन ठेवायला सांगितले. उगाच खाजुन आवधान कशाला आनायचे?
सकाळी फ्रेश मुड मधे ते जेव्हा ग्रामपंचायतच्या दिशेने येऊ लागले तेव्हा टमरेल घेऊन जाणाऱ्या राम्या अण सुरश्याला पाहुन त्यांच्या डोळयापुढं ग्रामपंचायतित लावलेलं 'हगणदारी मुक्त गांव'च प्रमाणपत्र नाचु लागलं. ती इस्किम लै भारी निघाली हुती. घरोघरी संडास बाथरूम दाखुन, त्याचे फुटू तयार करुन घरामाघं धा हजार लाटले हुते. त्यापैश्यात आणलेली बोलेरो आठवतच सरपंच ग्रामपंचायत कार्यालयात आले.
सर्व ग्रामपंचायत सदस्यांना बोलावून घेतले. पण कुणाला काही तोडगा सुचला नाही. शेवटी उरलेल्या दोन तिन दिवसात होईल तेवढया सुधारणा करायच्या ठरवून सर्वजन कामाला लागले.
पाचशे पाचशे देऊन तिन बायांना तिन दिवस गावातले रस्ते झाडायचे सांगितले.
पाचशे देऊन गवंडयाला ग्रामपंचायतच्या व झेंडावंदनच्या बांबूखालच्या पायऱ्या नीट

करुन द्यायला सांगितलं.
हजार देऊन गावतल्या ब्यूटीपार्लरवालीला तिन दिवस अंगणवाडी भरवायची सांगितली.
दामू सुताराच्या, रघु खाड्याच्या, मंठा काळे अण राजू कांबळेच्या घरावर चुण्यानी 'इंदिरा गांधी आवास योजना' असे लिहिले. त्याचे त्यांनी प्रत्येकी पाचशे पाचशे घेतले.
ग्रामसेवकाने गावातल्या वृद्धांना बोलवुन कसल्यातरी कागदावर अंगठे घेतले. ज्यांनी "कहयासाठी घेता?" म्हणून विचारले त्यांना दोनशे दोनशे रुपये दिले.
हजार रुपये तासानी जेसीबी आणून गावाजवळच्या नदीत खड्डे खणुन घेतले.
असंख्य खटपटित दोन दिवस निघुन गेले. दुपार टळत आलेली. सरपंच बैठकीच्या खोलीत बसलेले. तेवढ्यात त्यांना पुन्हा ती पाच किलोमीटरची सड़क आठवली. जिकडं जिकडं सड़किचा पैसा फिरला त्या सर्वांना त्यांनी फोन लावले. सगळयांनी हात वर केले.
जवळपास सगळेच आमदाराच्या बैठकितले होते. त्यामुळे त्यांना घाबरायचे कारण नव्हते.
सरपंचाला खोली बंद करुन मोठ मोठ्याने रडायची तिव्र इच्छा झाली. रुमालाने घाम पुसत ते तसेच डोळे मिटवुन बसून राहिले.
जोरात वाजलेल्या फोनच्या रिंग ने ते दचकले.
"हेलो"
"भौ, गावांत लावलेल्या दाहीच्या दाही ब्यानरमंदी मोठ्ठा घोळ झालाय"
सरपंच ताबड़तोब घटनास्थळी हजर झाले.
ब्यानरवरचे म्याट्टर पाहुन त्यांना भवळच् आली. 'आमदार श्री भाऊराव गड़दे' च्या ऐवजी 'आमदार श्री भौराव गधड़े' झाले होते. आणि कहर म्हणजे आमदार साहेबांच्या नावाच्या ठिकाणी सरपंचाचा मोठ्ठा फोटो छापलेला व सरपंचाच्या नावाज़वळ आमदार साहेबांचा छोटा फोटो.
डोकं एवढं ठनकु लागलं की भौ ला ते आपटुन आपटुन फोडुन टाकवं वाटू लागलं.
डोळे पांढरे करुन खाली बसलेल्या भौ ला लोकांनी आधी दवाखान्यात नेऊन बीपी चेक केला आणि मग घरी नेऊन सोडले.
डॉक्टरने दिलेल्या गोळयांमुळे भाउंना चांगलीच झोप लागलेली. पण रात्री साडेबारा वाजता गन्या "भौ, ग्रामसेवक आलेत" म्हणाला की ते ताड़कन उठून बसले.
"बोला?"
"भौ, एक आयड्या सुचली'
ग्रामसेवकाने भौ च्या कानाजवळ जाऊन कुजबूज केली. भाऊंचा चेहरा खुलला. रात्री एक च्या सुमारास त्यांनी आमदार साहेबांच्या बंगल्यावर फ़ोन केला. भाऊ जवळपास अर्धा तास मिटक्यामारत आणि मोठ्याने खिदळत बोलत होते.
नंतर एक एक प्याक मारून दोघे झोपी गेले.
सकाळी आरामात उठून साधारण दहाच्या सुमारास सरपंच ग्रामपंचायतच्या आवारात आले.
मंडपवाल्याने दोन हजारात बसतो तेवढा मंडप टाकला होता. चार दोन खुर्च्या मांडून, सतरंजी हातरली होती. सगळे ब्यानर काढुन टाकलेले.

साधारणता बाराच्या सुमारास आमदार साहेब आले.
आल्या आल्या सरपंचांनी त्यांचे हार घालुन स्वागत केले आणि लगेच माईक हातात घेऊन जाहिर केले;
"राती आमदार साहेबांचं अन् आमचं बोलणं झालं. त्यापरमाणं.. आपल्या गावाच्या भल्यासटी... नव्या नव्या योजना सरकार कडून मंजूर करुन आनाया सटी... आपल्या गावाचं नांव गाजिण्या सटी म्या सरपंच इनायकराव... आमदार भौ च्या हजरित त्याहीच्या पक्षात परवेश करतो असं जाहिर करतो."

# 'ओ.एस.भौ'

प्रेषक, आनंद कांबीकर, Sun, 12/06/2016 - 00:12

"हे बघ तोह्याचनी हूत आसन त् नीट कर नै त् दी सोडून"
"तुमिच सांगा आता काय हुकलं बरं भौ मह्याकडून?"
"काय हुकलं मंजी? एक घंटा झालाय साधी पाच पानं छापणं होया ना तुह्याकडनं"
"आता म्या तरी काय करणार भौ? एक त् माही रॉम है उलशिक अण त्याच्यात तुम्ही देता भाराभर फायली सोडून. मंग म्या माह्याचनि होईन तेवढं करतु अण लैच गळयाच्यावर गेल्यार देतु हात टेकुन"
"जवा तवा नुसतं त्या रॉम चं सांगत बसतु. नीट पानं भाईर काढाय कशाला रॉम लागतिरं तुला? पाच पाच मिंटाला निसती पानं गळयात अड़कुन घेतु अण मंग बसतु केकलत"
"हे बघा भौ, लै उनं दुनं नगा काढत बसु. ज़रा त्या मावस्याकड़ं ध्यान द्या. तुमचं कै महत्वाचं काम चालु असलं तरी बी ते इथं तिथं टिचक्या मारत बसतं. त्याच्यामुळं तुमाला हँग हुतं. उगाच वड्याचं तेल वांग्यावर नगं काढुसा"
"ये प्रींटऱ्या नीट नांव घ्याचं! एक त् भौ चं अण आपलं काम चालु असतं तुहा मंदी मंदी

बोलाचा कै संबंध् नै. अण दुसरं मंजी भौ ला इच्चारल्या बगैर आपुन एक बी काम करत नै. भौ एकदा नई मनले की कुणी किती बी आदळ अपट केली तरी बी आपुण आपल्या पॉइंटरला जागचा हलु देत नै"

"हे बघ! तु मला याचं त्याचं सांगत बसु नकु. 'कोण काय कर'तं अण 'कोण कसं हे' ते मला चांगलं ठाव हे. पयलं तु मला त्या तेवढ्या प्रिंटा काढुन दी"

"भौ, लै गरम नका होउ. एकदा ठंड डोक्यानी मला पाठिल्याल्या सगळ्या फायली कैंसल करा अण जरा टप्प्या टप्प्या नी पाठा. म्या देतु काढुन"

"नै! नै! आपल्याला नै जमणार कॅन्सल बिन्सल करायला. एक त् तोह्यामुळं ते 'माउसराव' बी हँग झालेत, त्याहिला त् पॉइंटर बी जागचा हालिता येइना"

"मंग जा उखाड़ा काय उखाड़ाचं ते! आपुण त् रोलर बी जागचा फिरिणार नै"

"ये त्वांड सांभाळून बोल नैतर......"

"काय नैतर?...अं?..बोल ना? .. काय करणार तु? लै त् लै अनइंस्टाल करशिन्...त्याच्यावर काय करणार हेस?"

"आरं काय झगडे करताय कवाधरणं! कामं कराचं लैच जीवावर ईत असल त् मला सांगा ना! कशाला सारखं सारखं हँग हुता अण झगड़े करत बसता! एका सेकंदात 'कंट्रोल-अल्ट-डिलीट' मारते अण लोड कमी करतो"

"हा.. हा.. मारा बरं तेवढं 'कंट्रोल-अल्ट-डिलीट' अण पयलं मला बंद करुन टाका. गाणं म्हणुन म्हणुन पार तोंड दुखाय लागलं. कवाधरणं बघतुया! कुणाचं ध्यान बी नै अण कुणी ऐकत बी नै तरी एवढा मोठा आवाज करुन ठुलाय"

"ये स्पिकऱ्या, तोहा कुठुन मंदिच घोडा उधळला? तु असला काय अण नसला काय, कुणाला कै फरक पडत नै"

"बघा भौ, हेव मावस्या कसा चभर चभर करतोय ते! तुमिच तेला डोक्यावर बसुन ठिवलाय! अण तुमी जर तेला असंच कानात मुतु देला तर एक बी काम धड़ हुनार नै"

"भौ, मारू का 'कंट्रोल-अल्ट-डिलीट'?"

"तुमी गप रहा ओ.. तसं त् मंग म्या बी एक एक इंडो काढुन अण एक एक टिचकि मारून बंद करू शकत हाय.. पर बॅगरौंडाला भौ ची कामं चालु असत्यात म्हणुन गप बसतु... तव्हा तुमी बी गप ऱ्हा"

"कह्याची कामं? दोन पेंड्रायवं लावुन घेतलित अण बसलाय हिकडचि गाणं तिकड़ं करत. अंगात एवढुसि रैम अण सतरा चाळे... वरुन परत एकाधा कागुद गुतला त् म्हणायचं 'ह्याच्यामुळच् हँग झालू'.."

"लए बोलला बर् का प्रिंटया तु... ह्याचे परिणाम लय बेक्कार हुतील.."

"चल रे भौ.. कर काय कराचं ते.. बघु तुह्यात काय दम है ते.."

"जाऊ दया नं प्रिंटरराव! कह्याला वाकड्यात शिरता? शेवटी कई झालं तरी ते आपले मॅनेजर हैत.."

"कै नै कीबोर्डतई, भौ पयल्यावाणी नैय रायला... ह्या मावस्याचं ऐकून ऐकून त्याचं डोस्क भंगलय"

तेवढ्यात स्पीकर च्या थोबाडातून जोरात 'टिंग' असा आवाज आला अण डिसप्लेवर एका चौकटित छापुन आलं;
'कार्टरेज मिसिंग'
कुणीतरी प्रिंटर चं थोबाड़ उघडलं. जोरात खट्ट असा आवाज आला. एक हात त्याच्या उघडलेल्या तोंडात शिरला अण तोंडातुन हात घालुन किडनी उपसुन काढावी तसं कार्टरेज उपसलं. प्रिंटरला धस्स झालं. तो थरथरला. कार्टरेज झटकुन वापस बसवलं तसं तो आणखी जास्त थरथरला. मोठ्याने घुर्र घुर्र असा आवाज झाला. परत घुर्र घुर्र आवाज झाला अण क्षणार्धात छपलेली पानं भाईर यायला सुरुवात झाली.
पानं भाईर यायला लागली तसा माउस किंचाळला;
"हा! हा! हा!... बघितलंत्? .. भौ चा नाद करायचा नाय... सगळी दुनिया एकीकड अण आपले भौ एकीकड... भौ जिंदाबाद!"